# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. २३/०८/२००५

आज दि. २३/०८/२००५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ०६ दि. १२/०८/२००५ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

## उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. पाटील मोहन मधुकर | सभापती, स्थायी समिती |
| ४) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | सभागृह नेता |
| ५) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सभापती, महिला बालकल्याण |
| ६) | श्रीम. उर्मिला कोमल भामरे | उप-सभापती,महिला बालकल्याण |
| ७) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ८) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सदस्य |
| ९) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| १०) | श्रीम. म्हात्रे संगीता विजय | सदस्या |
| ११) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| १२) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| १३) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| १४) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| १५) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १६) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| १७) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १८) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १९) | श्री. नलावडे दिनेश दगडू | सदस्य |
| २०) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| २१) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| २२) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| २३) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २४) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| २५) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| २६) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर उर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| २७) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| २८) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| २९) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ३०) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ३१) | श्रीम. भोईर जयाबाई यशवंत | सदस्या |
| ३२) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| ३३) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| ३४) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| ३५) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| ३६) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | सदस्या |
| ३७) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| ३८) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ३९) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सदस्य |
| ४०) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| ४१) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ४२) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| ४३) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| ४४) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | सदस्य |
| ४५) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ४६) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ४७) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ४८) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ४९) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |
| ५०) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ५१) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ५२) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ५३) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ५४) | श्री. म्हात्रे तुळशीदास दत्तू | सदस्य |
| ५५) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ५६) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ५७) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ५८) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |
| ५९) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

## गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| २) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ३) | श्री. पाटील अशोक बळवंत | सदस्य |
| ४) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ५) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ६) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| ७) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ८) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| ९) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| १०) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| ११) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | सदस्य |
| १२) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| १३) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| १४) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | माजी महापौर (प्रथम) |
| १५) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| १६) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| १७) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| १८) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |
| १९) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| २०) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| २१) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| २२) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| २३) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| २४) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य |
| २५) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |

**मा. महापौर :-**

नमस्कार, महानगरपालिकेच्या सभागृहात महासभेकरिता उपस्थित असलेले मा. उपायुक्त श्री. अशोककुमार रणखांब, स्थायी समितीचे सभापती श्री. मोहन पाटील साहेब, महिला व बालकल्याण समितीचे सभापती सौ. सुरेखा गायकवाड, परिवहन समितीचे सभापती श्री. शांताराम ठाकुर साहेब, सभागृह नेता श्री. लिओ कोलासो साहेब, सर्व गटनेते, सर्व समितीचे अध्यक्ष, सन्मा नगरसेवक, नगरसेविका, उपस्थित असलेले महापालिकेचे सचिव श्री. हरेश पाटील साहेब, सर्व अधिकारी वर्ग, प्रेक्षक गॅलरीतील बंधू-भगिनी तसेच उपस्थित असलेला अधिकारी वर्ग. श्रावण महिना म्हणजे सणाचा महिना. श्रावण महिन्यात येणारे दहिकाला तसेच आपल्या सर्वांचा जिव्हाळ्याचा आणि भक्तीचा गौरी-गणपतीचा सण या निमित्त आपणा सर्वांना भाईंदरवासियांना हार्दिक शुभेच्छा. मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राच्या विकासातील महत्वाचा टप्पा म्हणजे आपल्या शहरामध्ये बससेवा सुरु करण्याचा आहे. याकामी आदरणीय नेते, पालकमंत्री मा. श्री. गणेशजी नाईक साहेब, श्री. मुझफ्फर हुसेन साहेब यांच्या स्वप्नाची पुर्तता मा. श्री. गिल्बर्ट मेंन्डोंसा तसेच आमच्या प्रथम महापौर सौ. मायरा मेंन्डोंसा यांच्या प्रयत्नाने आणि सर्व पक्षाच्या सहकार्याने परिवहन सेवा सुरु करण्यांत येणार आहे. याकामी मा. सभापती श्री. शांताराम ठाकूर आणि त्यांचे सर्व सहकारी, अधिकारी वर्ग, सन्मा. सदस्य, मा. उपायुक्त श्री. अजीज शेख साहेब, यांचे अथक प्रयत्न आजच्या महासभेमध्ये परिवहन सेवेसाठी तिकिट दर व पद मंजुरीच्या विषयाबाबत चर्चा करुन अंतिम निर्णय घेऊन आपण सर्वांनी ही महासभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी म्हणून मी सन्मा. सदस्यांकडून सहकार्याची अपेक्षा करते. धन्यवाद!

**मोहन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची परिवहन सेवा सुरु करणेबाबतचा आजचा प्रस्ताव आहे. मी मा. महापौरांना तसेच सन्मा. सभागृहाला सांगू इच्छितो की, परिवहन सेवेचे मा. सभापती श्री. शांताराम ठाकुर आज आपल्या सभागृहात आलेले आहेत. तरी आपण त्यांना डायसवर बसविले तर चांगले होईल. त्यांना सभागृहात येण्यास परवानगी द्यावी अशी मी मा. महापौरांना सभागृहाच्या वतीने विनंती करतो.

**मा. महापौर :-**

परिवहन सेवेचे सभापती यांना सभागृहात येण्याची आणि बसण्याची परवानगी देत आहे.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३८ चे वाचन केले.)

**मोहन पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वाढत्या विकास कामांमध्ये आज या ठिकाणी एक नवीन उपक्रम सुरु होत आहे. सन्मा. महापौर, सन्मा. पदाधिकारी, सन्मा. नगरसेवक तसेच आदरणीय पालकमंत्री श्री. गणेश नाईक साहेब, आदरणीय आमदार श्री. मुझफ्फर हुसेनजी, आदरणीय प्रथम महापौर श्रीम. मायरा मेंन्डोंसा मॅडम तसेच आदरणीय श्री. गिल्बर्ट मेंन्डोंसा साहेब यांनी आपल्या शहरामध्ये हा उपक्रम सुरु करावा असा मनोदय व्यक्त केला होता. आज त्या मनोदयाने परिवहन समिती स्थापन होऊन लवकरच बससेवा सुरु व्हावी या दृष्टीकोनातून आपण हा विषय पटलावर आणलेला आहे. (ठरावाचे वाचन केले.)

**नितीन ठाकूर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम परिवहन सेवा सुरु झाली पाहिजे. सर्व नागरिकांचे आणि या शहराचे याच्यामध्ये हित आहे. परंतु, आज आपण या ठिकाणी रुट ठरवित आहोत. आपण भाडे ठरवित आहोत. डिझेल आणि पेट्रोलमध्ये रु. ३/- ची वाढ होणार आहे असे आजच्या वर्तमानपत्रामध्ये आलेले आहे. म्हणून आज या सभागृहामध्ये परिवहन समितीचे मा. सभापती उपस्थित आहेत. त्यांनाही परिवहन सेवा चालावी असे वाटणे साहजीकच आहे. तुम्ही आता परवानगी घेता. एखादे वर्ष गेले आपण त्याचे भाडे ठरविले आणि त्याच्यामध्ये पुन्हा वाढ करण्याची परिस्थिती आली तर हा विषय पुन्हा महासभेत घेण्यापुर्वी त्यांची काय तयारी आहे याची मा. सभापतींनी सभागृहाला माहिती द्यावी की, आता या काळामध्ये एवढ्या दिवसामध्ये आम्ही या या समितीला पाचारण केलेले आहे आणि परिवहन सेवा लवकर सुरु होणार आहे. याच्यामध्ये परिवहन सेवेच्या मा. सभापतींनी निवेदन केले तर पुढच्या गोष्टीला आमची सुचना घेणे आम्हांला योग्य वाटेल.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, मिरा भाईंदर परिसरामध्ये बहुचर्चित अशी परिवहन सेवा चालू करण्याच्या दृष्टीने मिरा भाईंदरमधील सर्व लोकप्रतिनिधी या परिवहन सेवेच्या प्रयत्नात जोराने प्रयत्नशील होते आणि आज ही परिवहन सेवा चालू करावी म्हणून हा विषय महासभेत आलेला आहे. सर्वांचे मत आहे की, मिरा भाईंदर परिसरामध्ये आपली स्वतःची परिवहन सेवा असावी, चालू व्हावी, त्याबद्दल कोणाचे दुमत नाही. आपण ही परिवहन सेवा कशा पद्धतीने करावी याबाबत मागच्या सभेमध्ये बराच उहापोह झाला. परंतु, आज परिवहन समिती गठित झालेली आहे. त्यांचे अधिकार त्यांना दिलेले आहेत. प्रत्यक्षात परिवहन समितीचे मा. अध्यक्षसुद्धा या ठिकाणी आलेले आहेत. आपण आज इथे तिकिटाचे भाव ठरवित आहोत. ते भाव ठरवित

असतांना अध्यक्षांनी सभागृहाला पुन्हा एकदा सांगावे की, आपण परिवहन सेवा कशा पद्धतीने चालू करित आहोत. आपण बसेस कशा पद्धतीने बसेस उपलब्ध आहेत. आपल्या महापालिकेच्या मालकीच्या ज्या बसेस आहेत. त्या बसेस चालविणार आहोत की, आपण ठेका पद्धतीने बसेस घ्यायच्या आहेत. हे अध्यक्षांनी पुन्हा एकदा साभागृहाला सांगून पुढील चर्चा चालू करावी. कारण आपल्याला बरेच रुटस् ठरवायचे आहेत. बऱ्याच ठिकाणी थांबे द्यायचे आहेत, यासाठी सगळ्याचे सहकार्य लागेल. ते सहकार्य कोणालाही नको असे नाही. सगळ्यांना परिवहन सेवा हवी आहे. ही परिवहन सेवा हवी आहे. सर्वानुमते परिवहन सेवेच्या मा. अध्यक्षांनी याबाबत थोडासा खुलासा करावा अशी माझी विनंती आहे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महापोर महोदया, परिवहन सेवा चालू करणेबाबत आपली प्रक्रिया चालू आहे. या प्रवासी बसेसचा रुट, एरिया कुठून कुठपर्यंत आहे याची माहिती दिली तर आम्हांला त्याच्याविषयी बोलता येईल. कृपया, त्याचा खुलासा करावा.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर साहेबा, मला असे वाटते की, आपल्याकडे सभागृहाकडून ज्या-ज्या सुचना पोहोचतील त्यांच्या एकत्रितरित्या खुलासा परिवहन सेवेच्या मा. सभापतींनी केला तर ते चांगले होईल. या ठिकाणी स्थायी समितीचे मा. सभापती यांनी ठराव मांडण्याअगोदर त्यांना एक प्रकारे आणि आपल्या वरिष्ठ नेत्यांचे धन्यवाद व्यक्त केलेले आहेत. ते कौतुकास पात्र आहेत. कारण ज्या वेळेला सन २००२ मध्ये सार्वत्रिक निवडणुका पार पडल्या त्या वेळेला आपण नागरिकांना बऱ्याच प्रमाणात अभिवचन दिलेले होते. त्याचाच एक भाग म्हणून आपण परिवहन सेवा नागरिकांपर्यंत पोहोचवू आणि ती सुरु करु असे आपण एक प्रकारे नागरिकांना अभिवचन दिलेले होते. आपण त्याची पुर्तता आपल्या शुभहस्ते करावी. आपले नेते श्री. गिल्बट मेंन्डोंसा साहेब, पालकमंत्री सन्मा. गणेशजी नाईक साहेब, स्थानिक विधानपरिषदेचे सन्मा. सदस्य श्री. मुझफ्फर हुसेनजी, मा. उपमहापौर, सर्व सन्मा. सदस्य यांच्या माध्यमातून ही परिवहन सेवा सुरु होत आहे. या ठिकाणी सभागृहाकडून काही सुचना उपस्थित झालेल्या आहेत. मी माझ्याकडूनसुद्धा आपल्यापर्यंत पोहोचण्यासाठी या ठिकाणी दोन सुचना आपल्यासमोर मांडतो. एक तर सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल साहेबांनी या ठिकाणी शंका व्यक्त केलेली आहे. आपण वर्तमानपत्रामध्ये बघितले असेल की, गेल्या काही दिवसांपासून वर्तमानपत्रामध्ये सतत बातम्या येत आहेत. आपण ज्या पद्धतीने ते हे दर निश्चित करीत आहोत, त्या दरांबाबत सांगायचे झाले तर दि. १ सप्टेंबर १९८९ च्या परिपत्रकाला अधिन राहून आपण हे दर निश्चित केलेले आहेत. परंतु, यदाकदाचित यात चार-आठ दिवसांमध्ये, पंधरा दिवसात महिना दोन महिन्यात जर दरवाढ झाली तर आपल्याला त्या दरवाढीच्या अनुषंगाने ह्याच्यामध्ये काही फेरबदल करता येतील का? दुसरी गोष्ट म्हणजे, आपण या ठिकाण शाळेत जाणाऱ्या मुलांना सवलतीसाठी प्राधान्य दिलेले आहे. त्याहीपुढे जाऊन सर्वांना सहकार्य करावी अशी सभागृहाला विनंती करेन. मा. उपायुक्त श्री. अजीज शेख साहेब यांच्याकडे हा कार्यभार आहे. आपल्या शहातील जेष्ठ नागरीक जे या परिवहन सेवेचा वापर करणार आहेत, त्यांनासुद्धा ह्याच्यामध्ये कुठेतरी समाविष्ट करत येते का? आपण त्याचासुद्धा गांभिर्याने विचार करावा. जर तसे करता येत असेल तर आपण त्याचा ही प्राधान्याने विचार करावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर मॅडम, शहरामध्ये बऱ्याच वर्षापासून गाजावाजा होऊन आणि खास करुन आमच्या लोकांचा विरोध असूनसुद्धा परिवहन समितीचे गठन झालेले आहे आणि आता परिवहन समिती सुरु होत आहे. आमचा ह्याच्याकरिता विरोध होता की, या शहराकरिता बेस्टसारखी चांगली व्यवस्था द्यावी. परंतु, आपण त्याच्यामध्ये अपयशी ठरलो. महापालिकेने हे काम करायला घेतलेले आहे. आता परिवहन सेवा सुरु होत आहे. आपण परिवहन सेवा सुरु करु या. पुढे काय घडते ते नंतर बघू या. आपल्याला ते बघण्याची संधी मिळालेली आहे. ही परिवहन सेवा सुरु करीत असतांना या ठिकाणी हा जो ठराव पास केलेला आहे. दि. ०२/०८/२००५ रोजी फक्त आठ पॉईंट अ, ब असे नमुद केलेले आहेत व शेवटी ठरावाची समाप्ती झालेली आहे. या ठरावामध्ये फक्त जे भाडे आहे. त्याच्याबद्दल सांगितले गेलेले आहे. परंतु, त्याच्यामध्ये ६५ वर्षे किंवा ६० वर्षांच्या वर जे वृद्ध आहेत त्यांना जी सुट द्यायची आहे त्याबद्दल या ठरावात कुठेही आढळून येत नाही. त्याचा उल्लेख करावा. तसेच आपल्याला परिवहन सेवेमध्ये ही मर्यादित सेवा सुरु करावी लागेल. कारण आपण लॉंग रुट ठेवत आहोत. काशीमिरा रोडला ज्या बसेस धावणार आहेत त्याच्यामध्ये इथले काही मार्ग समाविष्ट होणार आहेत. आपल्याला मर्यादित सेवा ठेवावी लागणार आहे. तसेच, एस.टी. आणि बी.ई.एस.टी.ने सेवा सुरु केलेल्या आहेत. हात दाखवा आणि गाडी थांबवा या तत्वावर शहरातील इन्टिरिअर भागामध्ये, अंतर्गत भागामध्ये ही सेवा प्रथम तीन महिने प्रायोगिक तत्त्वावर सुरु करावी लागणार आहे. हात दाखवा गाडी थांबवा. कारण आपण जर स्टॉप-टू-स्टॉप बस चालविली तर मधले पॅसेन्जर रिक्षाने प्रवास करु शकतात, सहा सिटरने प्रवास करु शकतात आणि ओघाने आपल्या या बससेवेवर प्रवाशांचा परिणाम होणार आहे आणि आपल्याला आर्थिक तोटा सहन करावा लागणार आहे. मर्यादित बससेवेचे थांबे कमी ठेवावे कारण त्याचे दर जास्त राहणार आहेत. महिलांसाठी, वृद्धांसाठी, अपंगांसाठी राखीव आसने यांचा या बसच्या अंतर्गत ह्याच्यावर कुठेही उल्लेख केलेला नाही. तो उल्लेख करावा. ही आसने किती ठेवावी. याचासुद्धा डिटेल

अभ्यास करुन त्याची रचना ठेवावी. शाळेच्या वेळापत्रकानुसार शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी त्या-त्या वेळेला खास बसेस कशा सोडाव्या ते बघावे लागेल. म्हणजे जशी अभिनव विद्यामंदिर आहे. भाईंदर सेकंन्डरी स्कुल आहे किंवा सर्व महापालिकेच्या शाळा आहेत. त्या ठिकाणाहून जसे बी.ई.एस.टी. किंवा एस.टी. असते त्याप्रमाणे पुर्वी उत्तनवरुन भाईंदर सेकंन्डरीपर्यंत बस यायची. या सर्व विद्यार्थ्यांना ही बस घेऊन यायची आणि तिकडे खाली व्हायची. आपण ही सोय या ठरावात कुठेही केलेली नाही. मी सांगितले ते जवळजवळ एकूण सहा मुद्दे आणि प्रत्येक बस स्टॉपच्या बसेसमध्ये सजेशन अणि कम्प्लेंन्ट बॉक्स हे असावे. आपण ह्याच्यामध्ये संपुर्ण तिकिटाचे दर निश्चित करीत आहात. आता आमच्याकडे दोनच प्रकरणे आलेली आहेत. परंतु ती जी कॅश जमा होणार आहे, ती कॅश साधारणतः कुठे जमा करावी लागेल आणि कधी जमा करावी? कारण या अगोदर या नगपरिषदेमध्ये म्हणजे तत्कालीन नगरपरिषदेमध्ये अशा काही घटना घडलेल्या आहेत की, इकडच्या काही जेष्ठ क्लार्क लोकांनी स्वतःची टॅक्सची रक्कम आपल्यकडे एक-एक आठवडा ठेवून ती बीयर बारमध्ये उडवलेली आहे आणि ते निलंबित झाले. शेवटी विधानसभेमध्ये आमच्या लोकांनी प्रश्न विचारल्यानंतर त्यांना घरी बसावे लागले. हा इतिहास आहे. त्याकरिता ती जी रक्कम आहे, त्याबाबत काय कम्प्लशन असावे ते आम्हांला कुठेही कळलेले नाही. महत्वाचे म्हणजे सभागृहातील सर्व सन्मा. सदस्यांना या कागदाबरोबर भाडे आकारणी, गर्व्हर्नमेंन्ट नोटीफिकेशन, गृह संदर्भ, ९९८ टी.आर.एस. दि. १ सप्टेंबर १९८९ हे आम्हांला दिलेले नाही. आम्हांला याची कॉपी प्रत्येकाला सर्क्युलेट केली असती तर ते बरे झाले असते. आमच्या ज्ञानात थोडी भर पडली असती. माझ्या या सर्व सुचना या ठरावाच्या अंतर्गत समाविष्ट कराव्यात, ही माझी नम्र विनंती आहे.

**याकुब कुरेशी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छितो की, परिवहन सेवेचा पान क्र. २ विषय ७, अपंगांना साठ टक्केने जे विकलांग आहेत त्यांना भाड्यामध्ये जी सवलत देण्यांत आलेली आहे, त्याबाबत माझे असे मत आहे की, अपंगांचे परसेन्टेज न बघता त्यांना ती सवलत द्यावी अशी माझी एक उपसुचना ह्याच्यामध्ये नोंद करुन घ्यावी.

**मा. महापौर :-**

आता परिवहन सेवेचे मा. सभापती यांनी खुलासा करावा.

**शांताराम ठाकुर (सभापती, परिवहन समिती) :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, पहिल्यांदा मा. महापौर, मा. उपायुक्त श्री अशोककुमार रणखांब साहेब, मा. उपायुक्त श्री. अजीज शेख साहेब, विरोध पक्षनेता, सत्ताधारी पक्षाचे सन्मा. सदस्य, सन्मा. नेते यांना पुन्हा एकदा धन्यवाद देतो. सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल यांनी आपण कुठच्या पद्धतीने बससेवा सुरु करणार आहोत असा प्रश्न विचारलेला आहे. मला त्याबाबत असे सांगायचे आहे की, आमच्या परिवहन समितीमध्ये जे काही ठराव झालेले आहेत, आपण आमच्यावर विश्वास टाकलेला आहे. त्या विश्वासाला कुठेही तडा जाणार नाही याची मी या ठिकाणी ग्वाही देतो. आपण ज्यावेळेला बैंगलोरचा दौरा आणि पुण्याचा सी.आय.आर.टी.चा अभ्यास केल्यानंतर आमच्या असे लक्षात आले की, आम्ही विधानभवनमध्ये मा. पालकमंत्री श्री. गणेश नाईक साहेबांच्या बरोबर परिवहनच्या अधिकाऱ्यांची आणि गृह खात्याच्या अधिकाऱ्यांची सभा लावलेली होती. त्यावेळेला नगरविकास खात्याचे लोकसुद्धा हजर होते. त्यावेळेला त्या ठिकाणी असे ठरले गेले की, खाजगीकरणावर गर्व्हर्नमेंटचा जास्त जोर आहे. आपण त्या माध्यमातून गेलो तर आपल्याला कुठल्याही अडचणी निर्माण होणार नाहीत. आपण इन हाऊस म्हणजे आपण आपल्या स्वतःच्या एरियामध्ये, पालिकेच्या हद्दीमध्ये बससेवा सुरु करित आहोत. त्यामुळे तुम्हांला परवानगीची अडचण लवकरात लवकर निर्माण होणार नाही. म्हणून पहिल्यांदा इन हाऊस म्हणजे काजूपाडा, घोडबंदर, काशीमिरा, चेकनाका, उत्तन ते भाईंदर आणि भाईंदर (पूर्व), भाईंदर (प.) अशा प्रकारे बससेवा सुरु करण्याचे आम्ही आमच्या सभेत ठरविलेले आहे. सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस यांनी दरवाढीचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी तुम्हांला एकच सांगू इच्छितो की, आम्ही टी.एम.टी., एन.एम.टी., कल्याण डोंबिवली बेस्ट या सगळ्या बेस्टचा पहिल्यांदा अभ्यास केल्यानंतर आमच्या असे लक्षात आले की, सगळीकडे बेस्टचे दर फार कमी आहेत. बेस्टची सेवासुद्धा अतिशय सुंदर आहे. मला असे वाटते की, जगामध्ये प्रसिद्ध अशी बेस्टची सेवा आहे म्हणून आम्ही पुर्वी रु. ३/- दर ठरविण्याचा मिटींगमध्ये निर्णय घेतलेला होता. माजी मा. आयुक्त साहेब श्री. आर. डी. शिंदे साहेबांशी विचारविनिमय केल्यानंतर त्यांनी आम्हांला सुचना केली की, जर तुम्ही हे दर रु. ३/- स्टेजचे ठेवले तर डिझेलचे दर वाढल्यानंतर तुम्ही बसचे दर वाढविता येणार नाही. त्याचा लोकांमध्ये वेगळा मॅसेज जाईल. म्हणून तुम्ही संघटक आहात म्हणुन आपली सेवा कुठेतरी, तोट्यात जाऊ नये याकरिता तुम्ही बेस्टप्रमाणे दर ठरवा. त्याप्रमाणे आमचे श्री. सावंत नावाचे अधिकारी आहेत. त्यांनी तो अभ्यास केलेला आहे. त्यांनी ४०-५० वर्षे बेस्टमध्ये सेवा केलेली आहे. ते आपल्याकडे रिटायर होऊन तज्ञ म्हणून आलेले आहेत. आपण त्यांना नियुक्त केलेले आहे. आम्ही त्यांच्याशी विचार विनिमय केल्यानंतर आपण बेस्टचे दर या सभागृहामध्ये ठेवलेले आहेत. दुसरा प्रश्न म्हणजे सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी डिझेलबाबत सांगितलेले आहे, उद्या जर डिझेलचे दर वाढले तर तुम्ही काय करणार असा प्रश्न विचारला असता आम्ही तसे नियोजन केलेले आहे की, आपण खाजगीकरणातून बसेस घेत आहोत. त्याचे टेन्डर निघालेले आहे. आपण

खाजगीकरणातून बसेस घेण्यासाठी सहा-सहा महिन्याची मुदत दिलेली आहे. जर आज डिझेलचे दर वाढले तर आम्ही तुम्हांला सहा महिन्याने त्याची दरवाढ करुन देऊ. परंतु, तुम्ही लगेच सांगाल की, आम्हांला दरवाढ करुन द्या किंवा आम्ही बसेस बंद करु. तर आपण तशी कायद्यांत तरतुद केलेली नाही. आपण त्यांना सहा महिन्याचे निश्चितपणे सांगू. कारण डिझेलचे दर वाढणे हे आपल्या हातामध्ये नसते. म्हणून आपण त्यांना सहा-सहा महिन्याचा पिरिएड दिलेला आहे. आपण त्या सहा महिन्यामध्ये दरवाढ करुन देणार आहोत. आपण ही बससेवा का सुरु करत आहोत? त्याच्या पाठीमागे एक उद्देश आहे. आपण दि. १५ सप्टेंबर हा टार्गेट का धरलेला आहे. आपण वर्तमानपत्रामध्ये बातम्या वाचत आहात की, एस.टी. महामंडळ आणि महानगरपालिकेचा पत्रव्यवहार झालेला आहे. त्या पत्रव्यवहारामध्ये असे ठरलेले आहे की, दि. १५ सप्टेंबरला ज्या-ज्या शहरामध्ये एस.टी. महामंडळाची बसेस सुरु आहेत. त्या बंद करण्यांत येतील. कालच्या महाराष्ट्र टाइम्स आणि दै. नवशक्तीला बातमी आहे. सगळ्या वर्तमानपत्रातून आणि टी.व्ही.च्या माध्यमातून सगळ्यांना त्या बातम्या सांगितल्या गेलेल्या आहेत. त्याचे व्यवस्थापक श्री. खोब्रागडे आहेत. त्यांनी त्यांचा व्यवहार सांगितलेला आहे की, आम्ही दि. १५ सप्टेंबरला कुठल्याही परिस्थितीमध्ये प्रत्येक शहारातील एस.टी.च्या सेवा आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिकेचे नांव वर्तमानपत्राला नसले तरीसुद्धा आम्ही ठाण्यामध्ये एस.टी. महामंडळाच्या अधिक्षकांना भेटल्यानंतर त्यांनी आम्हांला सांगितले की, आम्ही मिरा भाईंदर शहरातील एस.टी.ची सेवा बंद करणार आहोत. म्हणून आपण दि. १५ सप्टेंबर किंवा त्या काळामध्ये परिवहन सेवा सुरु करण्याचे निश्चित केलेले आहे. धन्यवाद!

**रक्षा शहा :-**

मा. महापौर मॅडमच्या आदेशाने बोलू इच्छिते की, परिवहन सेवेच्या मा. सभापतींनी रुटबाबत सांगितलेले आहे. मी आपल्याला त्याच्याबद्दल विनंती करु इच्छिते की, जसे आपण भाईंदर (प.) ते उत्तन असा रुट सांगितला. परंतु, उत्तनमध्ये केशवसृष्टीमध्ये जाणारा भाग वेगळा आहे. तो आत पर्यंत पोहोचताना जर लोक चेकनाक्यापर्यंत उतरले तर त्यांना आतमध्ये जायला रु. २०/- पर्यंत भाडे द्यावे लागते. आपण त्याच्यासाठी केशवसृष्टी आतपर्यंतचा रुट करुन घ्यावा. अशी माझी विनंती आहे. तिथे रामरतन विद्यामंदिर शाळा आहे. तीसुद्धा आपल्या भाईंदरच्या परिसराचा एक हिस्सा आहे. आपण तिथेसुद्धा एका बसची सोय करायला पाहिजे. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी हे एक प्रशिक्षण संकुलन आहे. तिथे येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांची वस्ती आहे. आपण त्याच्यासाठी एक रुट तयार केला पाहिजे अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

**मा. महापौर :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी सुचविलेल्या उपसुचना आणि दुरुस्त्यांसह ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**जयंत पाटील :-**

याच्यामध्ये कुणाचा विरोध असण्याचे कारण नाही.

**रोहित सुवर्णा :-**

कुणाचा विरोध असण्याचे कारण नाही. परंतु, आमच्या काही सुचना आहेत.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा, तुमच्या सुचना घ्यायच्या आहेत. परंतु, मी त्यांना प्रश्न विचारलेला आहे. त्यांनी आता उत्तर दिलेले आहे. परंतु, त्यांनी आमच्या सुचनांबाबत सांगितलेले नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल, तुमच्या सुचना घेतलेल्या आहेत.

**जयंत पाटील :-**

अध्यक्ष महाशय, प्रथमतः माझे मित्र आणि परिवहन समितीचे मा. सभापती यांचे मी अभिनंदन करतो. त्यांना जेवढी घाई बससेवा चालू करायची आहे. निश्चितपणे तेवढी घाई आम्हांला आहे. आपली स्वतःची परिवहन सेवा असावी, आपल्या स्वतःच्या गाडीत बसण्याची मजा वेगळी असते. मग ती छोटी असो किंवा मोठी असो. परंतु, काही गोष्टी आपल्याला निश्चितपणे ध्यानात ठेवल्या पाहिजेत. आता त्यांनी डिझेलच्या दरवाढीचे दर सांगितले. परंतु, मला हेच कळत नाही की, आतापर्यंत इन्फ्रास्ट्रक्चरची सोय काय झालेली आहे? ही माहिती त्यांनी दिलेली नाही. कुठे-कुठे बस थांबे तयार झालेले आहेत त्याप्रमाणे बससेवा असणार आहे. १५ तारखेला एस.टी.च्या बसेस बंद होणार आहेत. तेव्हा त्यांनी फक्त चालू करणे किंवा नाही हे सांगितलेले नाही. परंतु, १५ तारखेला बसेस बंद होणार आहेत. परंतु, आपल्या शहरात शॉर्ट डिस्टन्सच्या बसेस चालत नाहीत. आपल्या लांब पल्ल्याच्या बसेस आहेत. ज्या एस.टी.च्या बसेस आपल्या शहरातून जातात त्या लांब पल्ल्याच्या आहेत. त्या ठाण्याच्या किंवा इतर दूर पल्ल्याच्या ठिकाणची असो. त्याच्यामुळे त्या बसेस बंद होण्याचे काही कारण नाही. आपली जी बससेवा आहे ती फक्त शहरापुरती मर्यादित असावी. उत्तन-भाईंदर बस बंद होऊ शकते. परंतु भाईंदर पासून ठाण्याला जाणाऱ्या ज्या एस.टी. बसेस आहेत, आपण त्या संबंधी खुलासा केलेला नाही. आपण आपली गॅरेजेस तयार करणार आहात का? की, आपल्या गाड्या बंद पडल्यानंतर गॅरेजेस तयार करणार आहोत. कारण आपण एस.टी.च्या गाड्या बघतो. त्या एस.टी.च्या गाड्या रस्त्यात कुठेतरी पडलेल्या असतात. लोक रस्त्यामध्ये हात करित असतात. आपल्या

गाड्या बंद पडल्यानंतर त्याचे गॅरेज कुठे आहे. त्या गाड्या कुठे दुरुस्त केल्या जातील. तुमच्या बसेस ठेवण्यासाठी तुमच्याकडे बस डेपो कुठे आहे. आपण त्याची काय सोय केलेली आहे किंवा आपल्याकडे ज्या रिझर्वेशनसाठी जागा आहेत त्या रिझर्वेशनमध्ये कुठेतरी डेपोसाठी जागा उपलब्ध केलेली आहे का? याबाबत आमच्या सन्मा. मित्रांनी काहीच माहिती दिलेली नाही. मी त्यांना विनंती करतो की, आपण आम्हांला इन्फ्रास्ट्रक्चरसंबंधी माहिती द्या. बसेस चालू करणे हे महत्त्वाचे नाही. परंतु, ती बस चालू करुन पुन्हा बंद होणे चुकीचे होईल. आपल्या पुण्याच्या एका संस्थेने या शहरामध्ये बससेवा चालू करायची आहे की, नाही यासंबंधी जेव्हा निरिक्षक केले तेव्हा त्याच्या पुस्तकामध्ये त्यांच्या टिपणीमध्ये सरळ लिहिलेले आहे की, जगाच्या पाठीवर कुठेही बससेवा नफ्यामध्ये गेलेली नाही असे त्यांच्या टिपणीमध्ये आहे आणि मी जरा आनंद व्यक्त करेन, आनंद होईल, चांगले होईल. परंतु, तो आनंद कशा तऱ्हेने होणार, काय होणार यासाठी आपण काय-काय केलेले आहे, इन्फ्रास्ट्रक्चर कुठे आहे आणि कुठे दुरुस्ती केली जाईल याची त्यांनी जरा माहिती द्यावी.

**अनंत पाटील :-**

मा. महापौर महोदया, आता परिवहन सेवेचे मा. सभापती यांनी असे म्हटले की, उत्तन-भाईंदर एस.टी. गाड्या चालू करायच्या आहेत. परंतु, त्याच्यामध्ये पाली, चौक हे जे विभाग आहेत, त्या पाली चौकची व्यवस्था केलेली आहे की नाही. उत्तन-भाईंदरपर्यंत गेल्यानंतर मोर्वा हा रुट येतो. आमचा पुर्वी एस.टी.चा प्रवासी संघ होता. त्या प्रवासी संघाने मोर्वा गाडी आणि डोंगरी गाडी त्याचबरोबर उत्तन आणि चौक अशा तऱ्हेचा जो रुट होता तो रुट कायमचा बंद करणार आहात का? कारण तशी व्यवस्था आहे का? ह्याच्याबद्दल परिवहन समितीच्या मा. अध्यक्षांनी खुलासा करावा.

**रतन पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, बऱ्याच गोष्टींचा उहापोह होत आहे. आजपर्यंत बससेवा कुठेही फायद्यामध्ये गेलेली नाही हे सर्वानुमते माहिती आहे. तरी सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी एकदा पुनरुच्चार काढला की, आपल्या मिरा भाईंदरची बससेवा कशी फायद्यामध्ये जाईल. आपण यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करायचे आहेत. मी दोन-तीन सुचना देत आहे. त्याचा थोडासा विचार करणे योग्य आहे. आपण महापालिकेच्या परिवहन सेवेमध्ये ठेक्यामध्ये बस घेणार आहोत. ठेक्यामध्ये बस घेण्याचे प्रमाण अनुक्रमे २५ आणि ७५ टक्केप्रमाणे असावे. महापालिकेच्या बसेस ७५ टक्के असाव्यात आणि ठेक्याच्या २५ टक्के असाव्यात. असे मी मत व्यक्त करतो. तसेच आठ तासाची एक पाळी असावी. कामगार आणि कर्मचाऱ्यांसाठी मोफत पास असावेत आणि काही कामगार आणि कर्मचाऱ्यांसाठी भाडे तत्त्वावर निवासाची सोय करावी. होत असेल तर खाजगी बसवर ज्या जाहिराती लावल्या जातील त्या जाहिरातींचे उत्पन्न त्या खाजगी बसचालकाला न देता पालिकेला द्यावे. कारण त्याच्यामुळे पालिकेच्या उत्पन्नात भर पडेल ह्याची नोंद करुन घ्यावी. तीन वर्षाखालील मुलांना मोफत प्रवास आणि रोजच्या प्रवाशांसाठी पास ३० ते ४० टक्के सुट देऊन प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पासमध्ये ७० टक्के सुट द्या. माध्यमिक विद्यार्थ्यांच्या पासमध्ये ६० टक्के सुट द्या. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या पासमध्ये ५० टक्के सुट द्या. जर अशा पद्धतीने दुसऱ्या नगरसेवकांना सुद्धा दिले तर ते उत्तम होईल. प्रश्नच नाही कारण मुंबई महापालिकेमध्ये ज्या बेस्टच्या बसेस चालतात तिथेसुद्धा आम्ही नगरसेवकांचे कार्ड दाखवून करतो. असे असेल तर नाहीतर प्रत्येकाची तिकिट काढण्याची क्षमता आहे. आता दुसऱ्या नवीन बसेस निघालेल्या आहेत. ड्रायव्हर व्यतिरिक्त म्हणजे कंडक्टर नसतो. त्यांचे दरवाजे लो-मॅटीक प्रेशरवर असतात. एकदा कंडक्टर आतमध्ये चढला तर प्रवासी चढल्यानंतर जो तिकिट फाडतो तो आतमध्ये बसतो. जर अशा पद्धतीने कोणाचा प्रस्ताव असेल तर हरकत नाही. मी कर्मचाऱ्यांच्या संदर्भात बोलत नाही. परंतु, तरीसुद्धा अशा पद्धतीने सोय करता येईल. याचासुद्धा विचार व्हावा. तसेच, इतर उत्पन्नाची साधने, महामंडळ, शाळा, कार्यालये आणि कंपनीस भाडे तत्वावर बस पुरवाव्या लागत असतील तर पुरवाव्यात. कारण आपल्याला खाजगी बसच्या संदर्भात रेव्हेन्यु किंवा पैसे मिळतील. (ठरावाचे वाचन केले.)

**लिओ कोलासो :-**

मॅडम आमच आक्षेप नाही. परंतु, आम्हांला ह्या विषयावर बोलायचे आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

जर सुचना असतील तर तुम्हांला आक्षेप कशाला पाहिजे? तुम्ही आम्हांला सांगा की, सुचना मांडू नका, बाहेर जा. तुम्हांला काही त्रास होतो का?

**रतन पाटील :-**

तुम्ही चुकीच्या सुचना बोलत असाल तर मी बसतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. सदस्य लिओ कोलासो, तुम्ही बहुमताच्या जोरावर सुचना फेटाळा.

**लिओ कोलासो :-**

मॅडम, आम्हांला ह्याच्यावर बोलायचे आहे.

**रतन पाटील :-**

आम्ही दोन मिनिटात बोलतो. माझे पूर्ण झाले की बोला.

**प्रफुल्ल पाटील :-**

एक सन्मा. सदस्य बोलत असतांना मध्येच बोलायचे नाही.

**रतन पाटील :-**

सुरुवातीला साधारण १०० बसची सोय असल्यास सात ते आठ एकर जागेमध्ये एकाच ठिकाणी डेपो आणि वर्कशॉप असावा. अधिकारी, तंत्रज्ञ, कर्मचारी, कामगार यांची एकूण संख्या, ज्याप्रमाणे परिवहन सेवा ठरविल त्याप्रमाणे एकंदर ४५० च्या आसपास असावी. विभागवार चार बस स्टेशन असावे, भाईंदर (पश्चिम), भाईंदर (पूर्व), मिरा रोड आणि घोडबंदरच्या अंतर्गत परिवहन सेवा सुरु केल्यास नंतर भाईंदर-ठाणे, भाईंदर-बोरिवली अशा मार्गावर बस असाव्यात. इतक्या उत्पन्नाच्या दृष्टीने प्राधान्य द्यावे. बस प्रतिदिनी किलोमीटर कमीत कमी २२५ किलोमीटर धावणे आवश्यक आहे आणि डिझेल ॲव्हरेज प्रती लीटरप्रमाणे लागेल. तसेच आपल्याला आवश्यकता वाटेल तिथे परिवहन सेवेसाठी मनुष्यबळ लागेल ते कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने घेण्यांत यावे. म्हणजे आपण ते ठेक्यामधून घेऊन. ह्या माझ्या सुचनेवर विचार करावा. जास्त घाई करु नका. आपल्याला परिवहन सेवा व्यवस्थित चालू करायची आहे. प्रथम मी परिवहन सेवेच्या अध्यक्षांचे अभिनंदन करतो की, त्यांनी फार मोठ्या तत्परतेने इतक्या जोमाने काम करुन त्यांनी ही परिवहन सेवा सांगितलेली आहे. ही मला दि. १५ सप्टेंबरपर्यंत चालू कराची आहे. मिरा भाईंदरसुद्धा परिवहन सेवा चालू करु शकते असे दाखवून द्यायचे आहे. म्हणून मी परिवहन सेवेच्या मा. सभापतींचे अभिनंदन करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मा. महापौर मॅडम, दोन-तीन सुचना आहेत. एक तर आमचे सन्मा. नगरसेविका रक्षा शहा यांनी ती सुचना मांडलेली आहे. त्याबाबत सांगायचे झाले तर तो एक चांगला महत्त्वाचा परिसर आहे. तो परिसर कुठल्याही संस्थेचा असेल, कुठल्याही पक्षाचा असेल.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल, आपली सुचना घेतलेली आहे. आपण अगोदर सुचना दिलेली आहे.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

मी मागच्या वेळेला प्रश्न मांडलेला होता. त्या प्रश्नाचा खुलासा केलेला आहे. परंतु, मला आता बोलायला द्या. मी अजूनपर्यंत कुठलीही सुचना मांडलेली नाही. आम्ही त्यांना नंतर दिलेले आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ओमप्रकाश अग्रवाल, तुम्ही तुमची सुचना थोडक्यात मांडा.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

आता मा. सभापतींनी सांगितले की, सहा महिन्यानंतर आम्ही दरवाढ करणार आहोत. परंतु, दि. १५ सप्टेंबरला बसची सुरुवात झालेली आहे. दि. १५ सप्टेंबर ते सहा महिने दरवाढ होणार नाही. ठिक आहे. मीसुद्धा त्या गोष्टीला पुन्हा वाचा फोडत नाही. परंतु, सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी आपली शंका व्यक्त केलेली आहे. त्यामुळे सभागृहात खुलासा होणे गरजेचे आहे. दुसरी गोष्ट म्हणजे नं. ६ कॉलममध्ये इयत्ता दहावीपर्यंत शिकणाऱ्या अठरा वर्षावरील विद्यार्थ्यांना बस भाड्यामध्ये सवलत देण्यांत यावी. ही सवलत घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी व परत येण्यासाठी प्रवासापुरतीच उपलब्ध राहिल. आता शाळेत शिकणारी मुले शाळेपेक्षा जास्त ट्युशनला जातात, क्लासेसला जातात. ते विद्यार्थी शाळेत चाललेले आहेत की, कॉलेजला चाललेले आहेत, आपण त्यांचे व्हेरिफिकेशन कसे करणार? म्हणून आपण या ठिकाणी शालेय विद्यार्थ्यांना मासिक पासाचा उल्लेख करावा. त्याच्यामध्ये शाळेत जाणार आहे ही अर्हता नाही. दुसरे म्हणजे तुम्ही १२ वर्षाच्या मुलांच्या बस भाड्यामध्ये जी सवलत दिलेली आहे त्याबाबत मला थोडक्यात सांगायचे आहे की, मा. महापौर मॅडम, अख्या जगामध्ये, महाराष्ट्रामध्ये संपूर्ण देशामध्ये मुली शिकतील तर जग शिकेल अशी घोषणा शासनाकडून होत आहे. आपल्या महापालिकेने एक नवीन उपक्रम करावा की, दहावीपर्यंत शिकणाऱ्या ज्या मुली आहेत, ज्यांना आज शाळा कॉलेजमध्ये फी माफ आहे, त्यांना गणवेश, मोफत पुस्तके देण्यांत येतात अशा ज्या मुली आहेत त्या मुलींना या महापालिकेने सवलत फीमध्ये पास द्यावा अशी आमची सुचना आहे.

**शांताराम ठाकुर (सभापती, परिवहन समिती) :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो की, सन्मा. सदस्या रक्षा शहा यांनी ज्या सुचना केलेल्या आहेत, त्यांना आम्ही एक सुचवू इच्छितो की, आपण आता ज्या बसेस घेणार आहोत त्या टप्प्याटप्प्याने घेणार आहोत. उद्या जरी मोदी पटेलला सांगितले तरी आपली बस जाईल. परंतु, आपण आता वीस बसेस घेतलेल्या आहेत. प्रत्येक नगरसेवकांनी इच्छा व्यक्त केली की, आम्हाला काशीमिराला बस पाहिजे. सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी सांगितले की, मुन्शी कंपाऊन्डला पाहिजे. तरी आपल्या त्या इच्छा सध्या पूर्ण होणार नाहीत. कारण आपला १०० बसचा टार्गेट आहे. आपल्याला सी.आय.आर.टी.ने जो आराखडा दिलेला आहे, आपण आपल्याला त्याच्यामध्ये १०० बसेसमधून वसई, ठाणे, एस्सेल वर्ल्ड, गोराई असा तो रुट दिलेला आहे. त्या रुटप्रमाणे बस चालू करायच्या आहेत. परंतु, आपल्या ऐपतीप्रमाणे बस असणार आहेत. आपण नवीन आहोत. आपण नवीन असतांना फक्त वीस बसेसचे टेंन्डर काढलेले आहे. त्याच्यामध्ये किती बसेस

तयार होऊन येतील. आपण त्या पद्धतीने बसेस सुरु करणार आहोत. आपल्या सुचना निश्चित विचारात घेतल्या जातील.

**रक्षा शहा :-**

सभापती साहेब, मी आपल्याला सांगू इच्छिते आणि माझी रिक्वेस्ट आहे की, कारण भाईंदरमध्ये केशवसृष्टी हे एक पर्यटक स्थळ आहे. तिथे मुलांसाठी आणि लोकांसाठी एस.टी.सुद्धा नाही. तिथे लोक येतात-जातात. तुम्हांला त्याचा फायदा होणार आहे. माझे म्हणणे असे नाही की, केशवसृष्टी हा एक वेगळा भाग आहे. मी ह्याच्यासाठी बोलत आहे की, आपले तिथे उत्पन्न आहे. रोज ५०-१०० लोक फिरायला येतात.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य आपली सुचना समजलेली आहे त्याची दुरुस्ती करुन सामावून घेतली जाईल.

**रक्षा शहा :-**

मा. महापौर मॅडम, जर तो परिसर घेतल्यानंतर तुम्ही फक्त रामरतन विद्यामंदिर ते किशन गोपाल, राजकुर्या वानप्रस्ताव आश्रमचा परिसर तिथपर्यंत आपला एरिया आहे. मग तुम्ही तेवढ्या लोकांना वंचित करत आहात. म्हणून माझे सांगणे आहे की, आपण ही सुचना घ्यावी आणि त्यांच्यासाठी बससेवा उपलब्ध करुन देऊ कारण त्या ठिकाणी आदिवासी लोकांची वस्ती आहे. तुम्ही माझी सुचना लक्षात घ्याल अशी मी अपेक्षा करते.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, सभागृहामध्ये विविध प्रकारच्या सुचना आपल्यासमोर आलेल्या आहेत. आजच्या घटकेला परिवहन सेवा सुरु करतांना आपण सगळयांना सॅटीस्फाईड करु शकत नाही. कारण आपल्याला ही बससेवा टप्प्याटप्प्यामध्ये विकसित करायची आहे. ज्याप्रमाणे परिवहन सेवेच्या मा. सभापती महोदयांनी सांगितले की, एक प्रकारे एकंदर १०० बसेसचा आपला भविष्यकाळाचा टार्गेट त्यांनी निश्चित केलेला आहे. सर्व सन्मा. सदस्यांनी या ठिकाणी आपल्या समोर ज्या-ज्या सुचना मांडलेल्या आहेत. आपण या सर्व सुचनांचा विचार करावा. सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी या ठिकाणी रुट संदर्भात एक प्रश्न उपस्थित केलेला होता. एस.टी. महामंडळाने दि. १५ सप्टेंबरला शहरातील एस.टी. बसगाड्या बंद करण्याचे लेखी कळविलेले आहे. दि. ३ जुलैपासून ३० टक्के तोट्यामध्ये चाललेल्या एस.टी. गाड्या एस.टी. महामंडळाने जर त्या वेळेला ह्या फेऱ्या बंद करण्याचे ठरविले आणि दि. ३ जुलै पासून ते अंमलात आणले गेले. ४ तारखेला मा. पालकमंत्र्यांचा दौरा असतांना आम्ही त्या ठिकाणी मा. पालकमंत्र्यांना तशा प्रकारचे निवेदन दिले कारण उत्तन-भाईंदर रुटच्या दरम्यान ३० टक्के तोट्यामध्ये चाललेल्या फेऱ्या होत्या. सकाळच्या ४ वाजल्यापासून ते ६ वाजेपर्यंत ज्या गाड्या होत्या त्या रात्री साडेनऊ ते दीड वाजेपर्यंतच्या सर्व गाड्या एस.टी. महामंडळाने बंद करण्याचा निर्णय घेतला होता आणि त्या निर्णयामुळे शाळेत जाणारी लोक, शाळेत जाणारी मुले, सेकंन्ड शिफ्ट थर्ड शिफ्टला जाणारी लोक, भाजीवाल्या बायका, मासे विकणाऱ्या बायका, सगळ्यांची एक प्रकारे कुचंबणा झालेली होती. आम्ही आदरणीय पालकमंत्र्यांना निवेदन देऊन डी.टी.ओ.शी त्यांना बोलायला लावले. तरीसुद्धा त्यांनी एकही बसगाडी सुरु केलेली नाही. दि. १५ सप्टेंबर ही बॉटम डेट दिलेली असताना परिवहन समितीच्या सन्मा. सदस्यांनी व मा. सभापतींनी एक प्रकारे त्यांचे मनोगत निश्चित केलेले आहे की, आपल्याला दि. १५ सप्टेंबरला पहिल्या टप्प्यातील गाड्या सुरु करायच्या आहेत. आपल्याला या ठिकाणी एक विनंती करतो की, ज्या वेळेला उत्तन-भाईंदर हा रुट सुरु होईल त्यावेळेला कनेक्टेड म्हणून गोराई-मनोरीचा जो रुट आहे. त्याचा सुद्धा अंतर्भाव करावा लागेल. कारण एक वेळ एस.टी. महामंडळाने जर हा रुट बंद केला तर गोराई-मनोरीला जे प्रवासी उत्तनवरुन प्रवास करित असतात त्यांची एक प्रकारे कुचंबना होणार आहे. तुम्ही ज्यावेळेला रुटच्या संदर्भात उत्तन-भाईंदर रुट सुरु कराल त्यावेळेला गोराई-मनोरीचा जो रुट आहे. आपण त्या रुटचा त्याच्यामध्ये अंतर्भाव करावा अशी माझी आपणांस विनंती आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, आपण मला माझे विचार मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. मी बजेटमध्ये काही विशेष सुचना करतो. त्या सुचनांबाबत मला परिवहन समितीच्या मा. सभापतींकडून काही खुलासा पाहिजे. आपल्या बजेटमध्ये खालील तरतुदी केलेल्या आहेत का? या ठिकाणी मला ट्रान्सपोर्ट मॅनेजर यांच्याकडून काही गोष्टीचा खुलासा हवा आहे. याला परिवहन प्रबंधकांनी खुलासा करायचा असतो. भाडे आकारण्याची सिस्टिम, गॅरेजची तरतुद याची यावर्षीच्या बजेटमध्ये काय तरतुद आहे? शिवाय या बजेटमध्ये मुलांसाठी वाढीव खर्च अंतर्भाव करण्याची काय तयारी केलेली आहे. परिवहन सेवेत येणारी तुट भरुन काढण्यासाठी, लॉस भरुन काढण्यासाठी आपल्याला कुठल्या पद्धतीने अनुदान उपलब्ध करण्यांत येईल याचा काही खुलासा पाहिजे. दुसरे म्हणजे या ठिकाणी ट्रान्सपोर्ट मॅनेजर असतील त्यांनी माहिती दिली तरी चालेल. प्रकरण क्र. २० मध्ये जे मर्यादित सेवामध्ये ७ किलोमीटरसाठी रु. ६/- प्रौढ भाडे आहे त्या ठिकाणी सवलती भाडे रु. ३/- आहे, ते रु. ३.५० करावे. रु. ४/- केले तरी बरे होईल असे मला वाटते. कारण १० किलोमीटरला रु. ४/-, ५ किलोमीटरला रु. ३/- आणि ७ किलोमीटरला रु. ३/- आहे. आपण ते जरा व्यवस्थित पाहणी करावी अशी माझी विनंती आहे. मा. महापौर मॅडम, राज्य सरकारने आणि केंद्र सरकारने पाचवी ते दहावीपर्यंतच्या मुलींना शाळेत जाण्याकरिता मोफत प्रवास करण्याची सवलत देणबाबत शासनाचा

एक जी.आर. आहे. मी त्या जी.आर.चा नंबर वाचून दाखवितो. (जी.आर.चे वाचन केले.) त्याच्यामध्ये ग्रामीण भागातील मुलींना म्हणजेच ज्या मुली पाचवी ते दहावीपर्यंत शिक्षण घेत असतील त्यांना बस प्रवास मोफत आहे. ही माझी सुचना आहे. दुसरे म्हणजे सर्व शिक्षण अभियाना अंतर्गत सर्व्हे झाल्यानंतर प्रायमरी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झालेली आहे. आपण त्याबद्दलदेखील विचार करावा. दी परसन विथ डिझॅबिलीटी हा एक कायदा आलेला आहे. इक्वल अपॉर्च्युनिटीज प्रोटेक्शन ऑफ राइट ॲन्ड फुल पार्टिसिपेशन ॲक्ट १९९५, या ॲक्टच्या अंतर्गत मिनिस्ट्री ऑफ सोशल जस्टिस ॲण्ड एम्पॉवरमेंट गव्हर्नमेंट ऑफ इंडिया यांनी एक परिपत्रक काढलेले आहे. त्याच्यावर नॅशनल पॉलिसी बनविण्यात आलेली आहे. त्याच्यामध्ये अपंगांच्या बाबतीमध्ये त्यांना त्यावेळेला कुठल्या पद्धतीचे कन्सेशन द्यावे ते नमुद आहे. मी आपल्याला त्या शासनाच्या जी.आर.ची माहिती या ठिकाणी देत आहे. (जी.आर.चे वाचन केले.) म्हणजेच आय.ई.डी.सी.च्या अंतर्गतसुद्धा अपंग मुलांना शिक्षण घेण्याच्या संख्येत वाढ झालेली आहे. सेंन्ट्रल गव्हर्नमेंट आणि ॲटोमोबस बॉडी स्टेट गव्हर्नमेंट यांनीदेखील याबद्दल काही गाईडलाईन्स दिलेल्या आहेत. आमच्याकडे त्या गाईडलाईन्सची काही माहिती आहे. मी परिवहन समितीच्या मा. सभापतींना एक पत्र लिहिलेले होते. मला त्याचे उत्तर आलेले नाही. त्यामुळे या ठिकाणी मला सांगावे लागले. दुसरे म्हणजे सी.आय.आर.टी., सेंन्ट्रल गव्हर्नमेंट ऑफ रोड ट्रान्सपोर्ट यांनी मिरा भाईंदरसाठी फन्ड कसा रेज करावा याबद्दल खुप डिटेलमध्ये माहिती दिलेली होती. सन २००५-०६ ला कमीत कमी १०० बसेस चालू करण्यांत याव्यात असे त्यांचे ओपिनियन होते. बस आकाराची गरज या हेडखाली तो पान क्र. १७ वर दिलेला आहे. तसेच फन्डबद्दल सांगितले तर सन २००५-०६ साली किती जमिनी लागतील, किती इमारती लागतील, किती बसेसची संख्या लागेल, यांत्रिकी अणि यंत्र साधनसामुग्री किती लागेल. कारण रु. १,३००/- लाख भांडवलाची या ठिकाणी गरज आहे. आपल्याला सी.आय.आर.टी.ने हीदेखील माहिती दिलेली आहे. आपण तो फन्ड कुठून रेज करावा. आपण याच्यामध्ये शेवटच पान क्र २ वाचले तर त्याची संपूर्ण माहिती मिळेल. तसेच आपल्याला हुडकोमधून भांडवल कसे घेता येईल? आय.डी.बी.आय. कडून कसे घेता येईल? याची माहिती मिळेल. आपल्याला वीस बसेस इनसफिशन्ट आहेत. एक तर सुरुवात करावी. नंतर १०० करावी. म्हणून सी.आय.आर.टी. ह्या गव्हर्नमेंन्ट ऑफ इंडियाने आपल्याकडे दिलेला रिपोर्ट आहे.

**लिओ कोलासो :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही ह्या विषयावर बोलणार आहोत तुम्ही आम्हांला बोलण्याची संधी द्यायला पाहिजे. या ठिकाणी विषयांतर होत आहे. सन्मा. सदस्य विषयाला धरुन बोलत नाहीत. या ठिकाणी अशी परिस्थिती आहे की, ट्रान्सपोर्ट कमिटी ही वाहतुक कमिटीने नेमलेली आहे. ती एक अनोटोमिक बॉडी आहे. त्यांनी त्यांना कशा पद्धतीने काम करायला द्यायचे त्याच्या नियमावली आहेत, ह्या नियमावलीमध्ये समिती कार्य करित असतांना सभासदांनी त्यांना या ठिकाणी आणखी निवेदन, सुचना सांगणे हे त्या समितीच्या हक्कावर गदा येण्यासारखे आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, ठराव मांडत असतांना सुचक सन्मा. सदस्य मोहन पाटील यांनी सांगितले की, या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या वाहकाने विनंती केल्यास वाहन सोडले पाहिजे. कोणत्याही व्यक्तीची अशी विनंती तात्काळ मान्य न केल्यास त्यास वाहक आणि चालकाकडून बसगाडी भाडे बळजबरी करण्यांत येईल आणि त्या व्यक्तीस अपराधाबद्दल दोषी समजण्यांत येईल. दोषी समजण्याचा अधिकार आपला नसतो, तो अधिकार पोलिसांचा असतो. कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल असे शब्द ठरावात टाकण्यांत यावेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा, आपल्या सुचना लेखी स्वरुपात या ठिकाणी द्याव्यात.

**रोहित सुवर्णा :-**

मी मा. सभापतींना लेखी स्वरुपात सुचना दिलेल्या आहेत. त्याचे त्यांनी मला उत्तर दिलेले नाही.

**मा. महापौर :-**

आपल्या उत्तराचे समाधान होईल. आपण आता बसून घ्या. ह्या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे. ठराव मंजुर झालेला आहे. पुढचा विषय घ्या.

**रोहित सुवर्णा :-**

दारुची ट्युब आणि मच्छीची टोपली वगैरे बसमध्ये अलाऊड करु नका. हे कॉस्मोपॉलिटन शहर आहे. दारुची ट्युब, घासलेट, पेट्रोल या सगळ्या गोष्टीबद्दल कुठेही लिहिलेले नाही. उद्या बसमध्ये आग लागली तर काय करणार?

**मा. महापौर :-**

ठराव मंजुर झालेला आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, ट्रान्सपोर्ट मॅनेजरचे बजेटवर काय म्हणणे आहे त्याचा खुलासा केला पाहिजे.

**जयंत पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मघापासून विचारले की इन्फ्रास्ट्रक्चरबद्दल काय तजवीज केलेली आहे? परंतु, त्याची काहीही माहिती दिलेली नाही. मा. सभापतींनी सांगितले की, मा. उपायुक्त माहिती देतील. संपुर्ण माहिती द्या.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. महापौर मॅडम, आम्ही परिवहन समितीमध्ये ही सेवा चालविण्याच्या संदर्भात जो पॉलिसी डिसीजन घेतलेला होता त्याचे स्वरुप ढोबळ मानाने असणार आहे. मी सांगतो म्हणजे बऱ्याच सन्मा. सदस्यांच्या मनातील प्रश्न आहेत, त्यांचे निराकारण होईल. (पत्राचे वाचन केले.) आपण त्यांना कुठलीही सुविधा देणार नाही.

**जयंत पाटील :-**

त्यांना कुठली सुविधा असणार आहे?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

वर्कशॉप ठेकेदाराचाच असणार आहे.

**जयंत पाटील :-**

त्यांनी आतापर्यंत जागेचा बंदोबस्त केलेला आहे का? आम्ही १५ तारखेला बसेस चालू करतो असे सांगितले तर त्यांनी या योजना कुठे कुठे राबविल्या आहेत.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

त्याच्यामध्ये सांगतो की, आपण त्यांना डेपो किंवा वर्कशॉप अशी कोणतीही सुविधा उपलब्ध करुन देणार नाही.

**जयंत पाटील :-**

आपण सुविधा देणार नाही. परंतु, त्यांनी ही योजना तयार केलेली आहे का? आपण एवढा मोठा प्रोजेक्ट तयार करतो, परिवहन सेवा चालू करतो. तर त्यांनी या गोष्टीची काय तयारी केलेली आहे.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण जे टेंन्डर काढलेले आहे, आपण त्या टेंन्डरमध्ये सुस्पष्ट म्हटलेले आहे की, या संबंधात आमच्याकडून कोणत्याही इन्फ्रास्ट्रक्चरची सुविधा दिली जाणार नाही.

**जयंत पाटील :-**

आपण त्यांना त्या शहरामध्ये जागेसंबंधी कुठल्याही तऱ्हेची मदत करणार नाही असे आपले मत आहे का?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण त्यांना जागा उपलब्ध करुन देणार नाही.

**जयंत पाटील :-**

आपण त्यांना जागा उपलब्ध करुन देणार नाही. मग ते कुठे करतील?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

त्यांनी त्यांची स्वतःची व्यवस्था करायची आहे.

**जयंत पाटील :-**

त्यांनी त्यांची व्यवस्था करायची आहे. परंतु, ती व्यवस्था कुठे करणार आहे? त्यांनी व्यवस्था करायची आहे. हे जरी असेल तरी शेवटी परिवहन सेवा आपली आहे. उद्या त्यांच्याकडून कुठल्याही तऱ्हेची कमतरता भासली आणि त्यांनी जर ही सेवा बंद केली तर महापालिका बदनाम होईल. कॉन्ट्रॅक्टर बदनाम होणार नाही हे तुम्ही लक्षात घ्या. मा. महापौर मॅडम, जर परिवहन सेवा बंद पडली तर महापौर मॅडम, कॉन्ट्रॅक्टर काय, आला आणि गेला. ठिक आहे. जर त्यांनी डिपॉझिट ठेवले असेल तर त्यांला त्याची पर्वा नाही. शेवटी त्यांना इन्फ्रास्ट्रक्चर करण्यासाठी त्यांनी कुठल्या जागेची योजना आखलेली आहे. राई मोर्व्याला आहे की भाईंदर पूर्वला आहे की मिरा रोडला आहे. आपल्याकडे ह्याचे कुठल्याही तऱ्हेचे प्लॅनिंग नाही. आपल्याला काहीही माहिती नाही.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपल्याकडे सध्या अशा पद्धतीची जागा उपलब्ध नसल्यामुळे आपण तशा पद्धतीचे टेंन्डरमध्ये नमुद करतो.

**जयंत पाटील :-**

साहेब, आपण वीस दिवसामध्ये बसेस चालू करणार आहोत. जास्तीत जास्त २० ते २५ दिवस लागतील. ह्या २५ दिवसामध्ये त्यांचे कुठल्याही तऱ्हेचे इन्फ्रास्ट्रक्चर तयार नसेल तर आपली दि. १५ सप्टेंबर हा मूहुर्त टळून जाईल. आपल्याला ह्याची माहिती असणे गरजेचे आहे. आपल्याकडे कॉन्ट्रॅक्टर आता आलेला आहे का? आपण ज्याच्याकडून गाड्या घेतो तो कॉन्ट्रॅक्टर कुठे आहे?

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण टेंन्डर काढलेले आहे. आपल्याकडे अजुनपर्यंत टेंन्डर आलेले नाही.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब, आपण जे टेंन्डर काढलेले आहे. त्याच्या अटीशर्ती वाचून समाधान वाटले. परंतु, कुठलाही बाहेरचा व्यावसायिक येऊन आपल्या शहरामध्ये अशा प्रकारच्या ॲक्टिव्हिटीज सुरु करणार आहे. तेव्हा त्याच्यामध्ये दोन धोरणे आहेत. ती म्हणजे त्यांनी स्वतःच्या खर्चाने, स्वतःच्या हिंमतीवर असे बसथांबे, आगार किंवा गॅरेज हे त्यांनी बांधायचे आहेत. परंतु, त्यांना अशी जागा मिळाली नाही तर ते आपल्या रस्त्यावर वाहने थांबवणार आहेत. आपल्या जागांचा ते वापर करणार आहेत आणि त्यांना जर आपल्या सोयीप्रमाणे जागा मिळाली नाही तर तुम्ही त्या ठिकाणी बसथांबा प्रस्तावित करित आहात, ती जागा त्याला कशी मिळणार आहे. तुम्ही कुठेतरी त्यांच्याशी को-ऑर्डीनेशन केले पाहिजे की, हे बसथांबे आहेत. उत्तन ते भाईंदर या रस्त्यावर परिवहन सेवा सुरु करित असतांना या बसथांब्याच्या जागा त्यांना निश्चित करण्यांत येणार आहेत. आर्थिक बाब तो उचलणार असा कुठेतरी समन्वय झालेला आहे का? तुम्ही असा कुठला तरी मास्टर प्लॅन बनविलेला आहे का? तो म्हणेल की, मला त्या ठिकाणी जागा मिळालेली नाही. मी आता बोरिवलीच्या गॅरेजेमध्ये जाऊन त्याचे काम करुन किंवा तो रस्त्यावर गाड्या उभ्या ठेऊन तो दुरुस्त करेल किंवा तुम्ही त्या ठिकाणी बसथांबे देण्याचे प्रस्तावित करिता आहात तर त्या ठिकाणी तो करु शकणार नाही. तो सांगणार ही जागा मला देत नाही. कदाचित बी.ई.एस.टी. त्यांना वापर करायला देणार नाही, एस.टी. महामंडळ देणार नाही. आपण एकंदरीत दोघांनी म्हणजे मा. सभापती आणि परिवहन ट्रान्सपोर्ट मॅनेजर म्हणून आपण जे काही काम केलेले आहे ते अतिशय सुंदर आहे. म्हणजे मी या सभागृहात परिवहन समितीच्या मा. सभापंतीचे विशेष आभार मानतो. कारण, आत्तापर्यंत ह्या सभागृहामध्ये महापालिका स्थापन होऊन कोणी इतके चांगले निवेदन केले नाही. इतके सुंदर निवेदन त्यांनी त्यांच्या विषयाला पुरेसे केलेले आहे. म्हणजे त्यांनी त्यांचा अभ्यास पूर्ण केलेला आहे. आपणसुद्धा त्यांचा अभ्यास केलेला आहे. परंतु, आपण ठेका देत असतो . ठेका दिल्यानंतर ठेका घेणारा माणूस स्वतःच्या मनाने बसथांबे करेल का? हे कुठेतरी मास्टर प्लॅनमध्ये आले पाहिजे. म्हणून या ठिकाणी सगळी चर्चा बजेटची असावी. काही तरतुदी आहेत. त्यानी इतके चांगले काम केलेले आहे की, ह्याच्यामध्ये जास्तीत जास्त स्पीड आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु, प्रशासनाने तितकेच स्वतः जागरुक रहायला पाहिजे. परिवहन सेवा सुरु झाली, बसथांब्याचा पत्ता नाही, आगाराचा पत्ता नाही, गॅरेजचा पत्ता नाही, सर्व्हिस स्टेशनचा पत्ता नाही अणि कुठे कॅश न्यायची, कुठे ठेवायची तो एक प्रश्न झाला. त्याशिवाय ह्याच्या व्यतिरिक्त आपल्या बजेटवर ताण पडणार आहे. सुरुवातीला भाडे आकारले तर उत्पन्नाची बाब येणार आहे. बजेटमध्ये कुठेही आपली तरतुद नाही. कुठचीही नाही. आपण या चालू आर्थिक अर्थसंकल्पामध्य अशा प्रकरच्या खर्चाच्या तरतुदी करतांना विचार करायला पाहजे. समजा, तुमचा खर्च जास्त झाला तर तुम्ही बससेवा बंद करणार का? आम्हांला एखादा ठेकेदार असे म्हणाला की, जागाच उपलब्ध नाही. जर जागा उपलब्ध नसेल तर ती सेवा बंद करेल. तेव्हा पालिकेकडे काय उत्तर असणार आहे. तेव्हा पालिकेला स्वतःला जागा द्यावी लागेल. कारण तुम्हांला परिवहन सेवा चालू ठेवायची आहे.

**शांताराम ठाकुर (सभापती, परिवहन समिती) :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब आणि सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब यांची सुचना खरोखर चांगली असेल. मा. उपायुक्त श्री. अजीज शेख साहेबांना व्यवस्थित सांगायला जमलेले नाही. परंतु, आमच्या परिवहनच्या सभेमध्ये यापुर्वी असे ठरलेले होते की, शेवटी कॉन्ट्रॅक्टर जरी असला, खाजगीकरण जरी असले, किंवा आपल्याकडे सध्या जागा उपलब्ध नसली तरीसुद्धा कॉन्ट्रॅक्टरसाठी आपल्या महानगरपालिकेच्या समितीमध्ये ज्या आरक्षित जागा आहे. आम्ही अशा चार-पाच जागांवर लक्ष केंन्द्रीत केलेले आहे. याबाबत मा. आयुक्त साहेबांशी चर्चा केलेली आहे. आपण त्यांना निश्चितपणे बसगाड्या उपलबध करण्यासाठी त्यांच्या खर्चाने त्यांना भराव करावा अशा पद्धतीचा विचार आम्ही आमच्या परिवहन समितीमध्ये मांडलेला आहे. तो ठराव पुढच्या मिटींगमध्ये निश्चितच ठराव होणार आहे. टाऊन प्लॅनिंगच्या लोकांना बोलावून आपण अशा चार-पाच जागा पाहिलेल्या आहेत. आम्ही निश्चितपणे आपल्या विचारांशी सहमत आहोत.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती महोदय, आपण म्हणता की, शहरामध्ये आरक्षणाच्या जागा आहेत. आपण कुठल्या जागेसंबंधी बोलता? आपण कुठल्या जागा ताब्यात घेणार आहात. त्या जागा आपल्या ताब्यात आलेल्या आहेत का? आपल्या ताब्यात जागा येण्याची प्रक्रिया खूप मोठी आहे. त्या जागा मालकांनी ती जागा अजुनपर्यंत आपल्या ताब्यात दिलेली नाही.

**शांताराम ठाकुर (सभापती, परिवहन समिती) :-**

ट्रक टर्मिनल म्हणून घोडबंदरला एक आहे, वेस्टर्न हॉटेलकडे आहे.

**जयंत पाटील :-**

माझे म्हणणे आरक्षणाच्या जागेसंबंधी आहे आरक्षणाची जागा फॉरेस्टची असेल तर सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा म्हणतात त्याप्रमाणे ती जागा मिळणे कठीण आहे.

**शांताराम ठाकुर (सभापती, परिवहन समिती) :-**

मी आरक्षणाच्या जागेबाबत बोलतो. त्या आरक्षणाच्या जागा आहेत. आपण त्या जागा महानगरपालिकेकडे मागणार आहे.

**जयंत पाटील :-**

मा. सभापती महोदय, आरक्षणाची जागा ताब्यात घेणे सोपे नाही.

**शांताराम ठाकुर (सभापती, परिवहन समिती) :-**

आमच्या परिवहनची ती पॉलिसी आहे.

**जयंत पाटील :-**

तुमच्या पॉलिसीचा वेगळा भाग आहे. परंतु, तुम्ही १५ तारखेला परिवहन सेवा चालू करणार आहात.

**शांताराम ठाकुर (सभापती, परिवहन समिती) :-**

आपल्या प्रश्नाला आम्ही असे उत्तर देतो की, आपण काय प्रश्न विचारला की, तुम्ही त्या कॉन्ट्रॅक्टरसाठी कुठे बसेस उभ्या करणार आहात? सध्या तरी ती कॉन्ट्रॅक्टरची जबाबदारी आहे. तो वीस बसेस कुठेही उभ्या करु शकेल किंवा आपण त्याच्यासाठी एस.टी. महामंडळाचे रिझर्व्हेशन करु शकतो.

**जयंत पाटील :-**

आपण आरक्षणातील कुठल्या जागा घेतलेल्या आहेत त्याच्याबद्दल माहिती द्या.

**शांताराम ठाकुर (सभापती, परिवहन समिती) :-**

आम्ही आपल्याकडे तसा प्रस्ताव निश्चितपणे पाठवू.

**जयंत पाटील :-**

एखाद्या सभेमध्ये एखादा विषय आल्यानंतर तो विषय माझ्याकडे पाठविणार की, मी तुमच्याकडे येणार, हा विषय होत नाही. त्या जागा आपल्या ताब्यात आलेल्या नाहीत असा प्रश्न उद्‌भवलेला आहे. आपण १५ तारखेला बसेस चालू करायचा प्रयत्न करीत आहात.

**शांताराम ठाकुर (सभापती, परिवहन समिती) :-**

आम्ही १५ तारखेला बसेस चालू करण्याचा जो प्रयत्न करणार आहोत त्याच्यामध्ये कॉन्ट्रॅक्टरवर ती जबाबदारी टाकलेली आहे की, तुझ्या ज्या वेळेला १५ तारखेला बसेस येतील तेव्हा तुम्ही त्या बसेस तुमच्या जबाबदारीने उभ्या करायच्या आहेत.

**जयंत पाटील :-**

कॉन्ट्रॅक्टरच्या जबाबदारीचा वेगळा भाग आहे. मी आपल्या उत्तराने समाधानी झालेलो नाही आणि सभागृह समाधानी झालेले असेल असे मला वाटत नाही. आपण रिझर्व्हेशनमध्ये निश्चित कुठली जागा घेतलेली आहे ती मला माहिती नाही. कारण रिझर्व्हेशनची जागा आपल्या ताब्यात आलेली नाही.

**रतन पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मी जरा एक जागा सुचवितो. सध्या आपल्या बसडेपोची जी जागा जागा आहे, महापालिकेने किंवा परिवहन सेवेने त्याची मागणी करावी.

**चंद्रकांत मोदी :-**

मा. महापौर मॅडम, हम लोग जैसे बैंगलोर गये थे।

**शांताराम ठाकुर (सभापती, परिवहन समिती) :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील यांच्या माहितीकरिता सांगतो की, आरक्षण क्र. ५८ भाईंदर पार्किंगकरिता, २६४(ए) नवघर पार्किंगकरिता, २६४ नवघर महापालिका कार्यालय, ३२६ घोडबंदर ट्रक टर्मिनलकरिता, ३५८ मिरा पार्किंगकरिता, आणि २९४ नवघर पार्किंगकरिता. आपण या जागांची महानगरपालिकेकडे मागणी करावी. आम्ही परिवहन समितीच्या १९ तारखेच्या सभेत डेपोसाठी, बस उभी करण्यासाठी ठराव केलेला आहे.

**जयंत पाटील :-**

आपण आता ही जागा सांगितली. त्या जागेवर आता कुठेही आरक्षण आहे, आता आरक्षण असले आहे? तुम्हांला ते आरक्षण बदलावे लागेल. आपण ते बदलले आहे का? ते आरक्षण बदलणे ही एक वेगळी प्रक्रिया होईल.

**चंद्रकांत मोदी :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील साहेब, मै वही बताता हूँ। हमारी सभा मे किसी को याद नही, कुछ मालुम नही है। हम लोक जब बैंगलोर गये थे तब हमारे श्री. अजीज शेख साहब और मा. अध्यक्ष साहब और डेपो मॅनेजर साहब का मै हार्दिक अभिनंदन करता हूँ। उन्होने हमको अच्छा बताया की, पहले भी कई सदस्योंने बताया की, यह सेवा लॉस मे जा रही है। लेकिन बैंगलोर पॅटर्न आज तक लॉसमे नही गया है। हम लोग अभी स्टार्ट कर रहे है। वैसे स्टार्टींग मे थोडीसी बस लाते है। जैसे हम लोगों ने पाच बस लेने का ठराव किया। लेकिन हम लोगो ने पाच बस का सभामे यही बताया था की, पाच बसका टेंन्डर लेनेवाला आदमी जो कॉन्ट्रॅक्टर है। उसके उपर पुरी जबाबदारी है. उसके पास उसकी गॅरेज या बस खडी करने की जो जगह उपलब्ध होगी वही टेंन्डर ले सकता है, ऐसी बात हुई थी। वही हिसाब से जयंत पाटील साहेब, यह जगह का जो टेंन्डर लेगा और जो बस लायेगा उसके सिरपर वह जिम्मेदारी है। जब ज्यादा बस होगी

तब जैसे बैंगलोर के अंदर खुद का डेपो है, खुदका टायर बनाने का, रिमाइन्ड करने का है। वह सब हम लोग उधर जाकर उसका सब पुरावा भी लेके आये। उसी तरह उसकी जो कुछ साधनसामुग्री लगती है। बाद मे जब बस बढ जायेगी तब महानगरपालिका इन्टरेस्ट लेगी। पहले तो जो कॉन्ट्रॅक्टर है उसके पास ५० बसकी सुविधा होगी। आज पाच बस है, कल दस बस की जरुरत पडेगी। पांच बसवाला छठी बस नही लेगा ऐसा नही है। जो कॉन्ट्रॅक्टर कॅपेबल है उसको यह टेंन्डर दिया जायेगा। ऐसी बात हमारी सभा मे हुई थी।

**शांताराम ठाकुर (सभापती, परिवहन समिती) :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील यांच्या माहितीसाठी सांगतो.

**जयंत पाटील :-**

मा. उपायुक्त साहेब वेगळे बोलतात. मा. सभापती साहेब वेगळे बोलतात. सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी वेगळे बोलतात. सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी बोलतात की, कॉन्ट्रॅक्टर देखनेवाला है। हे बोलतात जागेचे रिझर्व्हेशन कुठले आहे? त्यांनी नंबर वाचून दाखविलेला आहे. ते रिझर्व्हेशन कसले आहे हे आम्हांला माहिती नाही.

**रोहित सुवर्णा :-**

मॅडम, सन्मा. सदस्य चंद्रकांत मोदी साहेब विरुद्ध बोलतात. दोन्ही वेगळे विषय आहेत.

**शांताराम ठाकुर (सभापती, परिवहन समिती) :-**

ज्या जागेवर रिझर्व्हेशन आहे ती जागा पार्किंगसाठी केलेली आहे. त्याच्यामुळे त्याच्यावर दुसरे रिझर्व्हेशन असण्याची जरुरी नाही.

**जयंत पाटील :-**

तुमच्या आरक्षणाच्या आराखड्यामध्ये कसले रिझर्व्हेशन आहे?

**शांताराम ठाकुर (सभापती, परिवहन समिती) :-**

पार्किंगसाठी आहे. हे आमच्याकडे आता आलेले आहे.

**जयंत पाटील :-**

ह्या सगळ्या जागा पार्किंगसाठी आहेत?

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, पार्किंगसाठी रिझर्व्हेशन असेल तर बससाठी रिझर्व्हेशन होऊ शकत नाही. रिझर्व्हेशन बदलण्यासाठी ३७(१) खाली कार्यवाही करावी लागते.

**एस्. ए. खान :-**

मा. महापौर महोदया, या ठिकाणी परिवहन समितीचे मा. अध्यक्ष आलेले आहेत. आपल्याला परिवहन सेवा चालू होऊ द्या. चालू झाल्यावर काय अडचण आली तर दुर करता येईल. आपला हा एक नवीन उपक्रम आहे. त्याच्यामुळे काही अडचण येणार आहे. एकदा परिवहन सेवा सुरु झाली की, हळूहळू त्याच्यामध्ये अडचण आली तर आपल्याला ती अडचण दूर करता येईल. प्रथम परिवहन सेवा सुरु होऊ द्या.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, नवीन पार्टनर आहे असे वाटते. ते कुठे स्टार्ट करणार आहेत, ते तरी सांगावे. मेन रोडवरुन मिरा भाईंदरच्या रोडवरुन स्टार्ट करणार आहे का?

**एस्. ए. खान :-**

तुमची पार्टनरशिप कुठे आहे ते दाखवा.

**शांताराम ठाकुर (सभापती, परिवहन समिती) :-**

सन्मा. सदस्य रोहित सुवर्णा, तुम्हांला त्रास होणार नाही. त्याची दक्षता घेतली जाईल.

**नितीन ठाकुर :-**

मेन रोडला बाहेरच्या बस उभ्या असतात. तर आपल्या नगरपालिकेच्या बसेस उभ्या करायला काय झाले?

**प्रकरण क्र. ३८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. परिवहन समिती सभा दि. ०२/०८/२००५, ठराव क्र. २१ नुसार मा. महासभेस शिफारस केलेल्या प्रवासी भाड्याचे दर निश्चित करणेबाबत.

**ठराव क्र. ३८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमामार्फत खाजगी सहभागातून भाडेतत्त्वावरील बसेसचा वापर करुन परिवहन सेवा सुरु केली जाणार आहे. त्याकरिता परिवहन समितीने ठराव क्र. २१ दि. ०२/०८/२००५ अन्वये भाडे सारणी बाबत निर्णय घेतलेला आहे. मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाच्या बसेसवर खालीलप्रमाणे भाडे आकारणी सारणी निश्चित करण्यांत येत आहे.

| अंतर कि.मी. | साधी सेवा | | मर्यादित सेवा | |
|---|---|---|---|---|
| | प्रौढ भाडे (रुपये) (पोषण अधिभारासहित) | सवलतीचे भाडे (रुपये) (पोषण अधिभारासहित) | प्रौढ भाडे (रुपये) | सवलतीचे भाडे (रुपये) |
| ३ | ४ | २ | ४.५ | २ |
| ५ | ४.५० | २ | ५ | ३ |
| ७ | ५ | ३ | ६ | ३ |
| १० | ७ | ३ | ८ | ४ |
| १५ | ९ | ४ | १० | ५ |
| २० | ११ | ५ | १२ | ६ |
| २५ | १३ | ६ | १५ | ७ |
| ३० | १४ | ७ | १६ | ८ |
| ३५ | १५ | ७ (कमाल) | १८ | ९ (कमाल) |
| | ३५ कि.मी. पेक्षा जास्त अंतरासाठी प्रत्येक अतिरिक्त ५ कि.मी. किंवा त्याच्या अंशभागाकरिता २०० पैसे जादा. | | ३५ कि.मी. पेक्षा जास्त अंतरासाठी प्रत्येक अतिरिक्त ५ कि.मी. किंवा त्याच्या अंशभागाकरिता २०० पैसे जादा. | |

१) भाडे आकारणी गर्व्हनमेन्ट नोटीफिकेशन, गृह विभाग, संदर्भ क्र. एमव्हीए-०६९२/१८३१/ सी.आर.५७/टीआरए-२, दि. १४ जुलै १९९४ च्या परिपत्रकाला अधिन राहून तयार करण्यांत आलेले आहे.

सदर परिपत्रा अन्वये प्रवाशांची गाडीत चढण्याची जागा / बस थांबा किंवा उतरण्याची जागा ही प्रादेशिक परिवहन प्राधिकरण ह्यांनी भाडे टप्पा म्हणून मान्यता दिल्याप्रमाणे सदर प्रवासाचे अंतर भाडे आकारणेकरिता तत्पुर्वीच्या भाडे टप्प्यापासून किंवा तद्नंतरच्या भाडे टप्प्यापर्यंत संमत करण्यांत आलेले आहे. याचाच अर्थ उपक्रमाच्या बसगाड्यांवरील प्रवासभाडे एका थांब्यापासून दुसऱ्या थांब्यापर्यंतच्या अंतरासाठी न आकारता एका भाडे टप्प्यापासून दुसऱ्या भाडेटप्प्यापर्यंतच्या अंतराच्या आधारे आकारण्यांत येईल.

२) महाराष्ट्र शासनाकडून आकारण्यांत येणारा पोषण अधिभार रु. २/- किंमतीच्या तिकिटापर्यंत १० पैसे व रु. २/- पेक्षा अधिक किंमतींच्या तिकिटावर १५ पैसे यात समाविष्ट आहे.

३) १२ वर्षे वयापर्यंतच्या मुलांना बसभाडे तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे सवलतीचे भाडे आकारण्यांत येईल.

४) प्रौढ भाडे देणाऱ्या प्रवाशाला ३ वर्षे वयाखालील एक मूल आसनावर न बसविता विना-आकार स्वतःबरोबर नेता येईल.

५) अंधांसाठी असलेल्या कोणत्याही मान्यताप्राप्त संस्थेच्या संपूर्णतः अंध असल्यासंबंधिच्या प्रमाणपत्र धारक अंध व्यक्तींना सवलतीचे भाडे आकारण्यांत येईल.

६) इयत्ता १० पर्यंत शिकणाऱ्या व १८ वर्षे वयापर्यंतच्या विद्यार्थ्यांना बसभाड्यात सवलत देण्यांत येईल. ही सवलत घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी व परत येण्यासाठीच्या प्रवासापुरतीच उपलब्ध असेल.

७) ६० टक्के किंवा अधिक कायम विकलांगता असलेल्या मान्यताप्राप्त संस्थेच्या प्रमाणपत्रधारक अस्थिव्यंग अपंगांना सवलतीचे बसभाडे आकारण्यांत येईल.

८) मान्यताप्राप्त संस्थेच्या प्रमाणपत्रधारक जेष्ठ नागरिकांना (Senior Citizen) सवलतीचे बसभाडे आकारण्यांत येईल.

९) **सामान (लगेज)** :

(अ) हातात धरण्यासारख्या (४० x २५ x १५ से.मी. पर्यंतच्या आकाराच्या) सामानाखेरीज अन्य आकाराचे अथवा प्रकारचे सामान की, ज्यामुळे इतर प्रवाशांना अडचण, उपद्रव किंवा गैरसोय होण्याची शक्यता आहे, अशा प्रकारचे सामान उपक्रमाच्या कोणत्याही वाहनामध्ये कोणाही व्यक्तीने आणू नये.

या नियमाचे उल्लंघन करणाऱ्या कोणाही व्यक्तीने, वाहकाने विनंती केल्यास वाहन सोडले पाहिजे. आणि कोणत्याही व्यक्तीने अशा प्रकारची विनंती तात्काळ मान्य न केल्यास, त्यास वाहक अथवा चालकाकडून बसगाडीभाडे बळजबरीने वसुल करण्यांत येईल आणि त्या व्यक्तीवर कायदेशिर कारवाई करण्यांत येईल.

(ब) प्रवाशांना स्वतःच्या जबाबदारीवर पुढील आकारमानाचे केवळ व्यक्तिगत सामान बस गाडीत जागा उपलब्ध असेल तरच योग्य ते भाडे देऊन वाहून नेता येईल.

कमाल आकार : ६० x ५७ x ३७ से.मी.

सामानावर आकारण्यांत येणारे भाडे (लगेज) तद्नुरुप प्रौढ भाड्याशी तुल्य (सममूल्य) असेल, मात्र किमान भाडे रु. ४/- व कमाल भाडे रु. १५/- असेल.

तरी वरील प्रमाणे परिवहन सेवेवरील भाडे आकारणी (सारणी) निश्चितीबाबत मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. मोहन पाटील.** **अनुमोदन :- श्री. नितीन ठाकुर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. ३९ चे वाचन केले.)

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ११ (ठरावाचे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

मा. महापौर महोदया, सदर ठराव मंजुर झालेला आहे आणि प्रकरण क्र. ३९ म्हणजे खरे बघायला गेलो तर हे प्रकरण सेपरेट मा. आयुक्त साहेबांच्या सहीने पाठवायला पाहिजे होते. आपण आस्थापनेवर काही लोक घेत आहोत. आपण १६९ पदे भरत आहोत. मघाशी मा. उपायुक्त श्री. अजीज शेख साहेबांनी जे संपुर्ण वाचन करुन दाखविले त्याच्यामध्ये शेवटपर्यंत कुठेही दिलेले नाही की, आपण ही जी पदे भरत आहोत. माझा असा काही वाईट हेतू नाही. कृपया सर्व सन्मा. सदस्यांनी मला समजून घ्यावे. मा. सभापती साहेब, माझे वाईट होत नाही. परंतु, एखादी गोष्ट करित असतांना त्याचे पुढे काय होईल याचा आपण ॲडव्हान्समध्ये विचार केला तर आपली पुढे अडचण होत नाही. त्या करिता मी आपल्याला माझा हा दुसरा ठराव वाचून दाखवितो. मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रम स्थापन झाला असून परिवहन सेवा महानगरपालिकेच्या वतीने पालिका परिसरात लवकरात लवकर सुरु करण्यांत येणार आहे. सदर उपमक्रमाचे कामकाज चालविण्याकरिता अधिकारी व कर्मचाऱ्यांची एकूण १८५ पदांची परिवहन सेवेकामी पदनिर्मिती करण्यात येत आहे. सदर पदे ही फक्त परिवहन उपक्रम कार्यरत असेपर्यंत अस्तित्वात राहतील. सदर ठरावास ही महासभ मंजुरी देत आहे. मी या ठरावाचा सुचक आहे. सदर ठराव वाचून कामय करण्यांत आला. ठराव पुढील कार्यवाहीकरिता मा. आयुक्त सोा. यांचेकडे पाठविण्यांत यावा.

**नयना म्हात्रे :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र ३९ परिवहन समितीची सभा दि. २ जुलैला झाली. ठराव क्र. १२ मध्ये वाहतुक अधिकाऱ्याचे बेसिक रु. ५,०००/- आहे. त्यानुसार ऑफिसर म्हटल्यानंतर त्याला ग्रेड येते. तुम्ही कॉलम नं. ३ मध्ये बघा. तिकिट आणि रोख सहाय्यक असे आहे. सहाय्यक शब्द आला की, असिस्टंन्ट असा त्याचा अर्थ होतो. त्याचेही बेसिक रु. ५,०००/- आहे. मला ह्याच्यामध्ये काहीतरी तफावत वाटते की, बेसिक सुरुवात करतांना एखाद्याला रिटायर होतांना भविष्यामध्ये त्याचा प्रॉब्लेम येतो. त्याबाबत परिवहन प्रबंधक साहेब, आपण त्याच्याबद्दल थोडासा खुलासा करावा. दुसरे म्हणजे, ठराव क्र. २२ मध्ये वाहतुक निरिक्षक हे पद पुन्हा रिपीट झालेले आहे. ते कॉलम क्र. ४, ठराव क्र. २२ मध्येसुद्धा रिपीट आहे. वाहतुक निरिक्षक त्या ठिकाणी रु. ४,०००/- बेसिक आहे. त्या ठिकाणी रु. ४,०००/- बेसिक आहे. सगळ्या कंडिशन सारख्या आहेत. ठराव क्र. १२ आणि २२ मध्ये वाहतुक निरिक्षक पुन्हा आहे. आपण इथे भरती करतो. त्यासाठी थोडेसे क्लेरिफिकेशन करावे अशी माझी विनंती आहे. वाहनचालक यांची वेतनश्रेणी रु. ३,०५०/- पासून सुरु होत आहे. पगार वाहकाएवढाच आहे किंवा वाढविणे. कन्डक्टर आणि ड्रायव्हर ह्या दोन्ही वेगवेगळ्या रिस्पॉन्सिबिलीटी असतात. आपण दोघांना जे बेसिक देता ते रु. ३,०५०/- पासून सुरुवात करित आहोत. आपण मला याबद्दल थोडासा खुलासा करावा अशी माझी विनंती आहे. दुसरे म्हणजे, महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये मोठ्या संख्येने स्थानिक लोक राहतात. त्यांच्याकडे स्थानिक म्हणून दाखला आहे. त्यांचाही विचार करण्यांत यावा. आपण ज्या ठिकाणी २१ ते ३३ वय (मागासवर्गीयांसाठी पाच वर्षे शिथील) असे आपण घडीघडी बोलतो. आपण त्या ठिकाणी कुठेही क्लेरिफिकेशन करत नाही की, एस.सी., एस.टी. किती, ओ.बी.सी. किती किंवा विमुक्त जाती, भटक्या जाती आणि एस.बी.सी. किती? शासनाचा एक जी.आर. तो मी या ठिकाणी आपल्याला वाचून दाखवतो. (जी.आर. चे वाचन केले.) हा दि. ०६ ऑगस्ट, १९६५ चा शासनाचा जी.आर. आहे. तसेच, थोडे क्लिअरन्स करावे. म्हणून काही महत्त्वाच्या गोष्टी असतात. त्या ठरावात घेतांना आपण डायरेक्ट घेत असतो. स्वच्छता कामगार आणि कन्डक्टर जास्त करुन घ्यावेत.

कन्डक्टरचा पब्लिकशी डायरेक्ट संबंध असा. त्यावळी त्यांच्याकडून कॉन्टेजिन्सी डिसीज यांना नाही, हादेखील दाखला लागतो. जो ठाणे महानगरपालिकेने प्रत्येक कन्डक्टरकडून घेतलेला आहे. त्याला कुठल्याही प्रकारचा संसर्गजन्य रोग नाही. कन्डक्टर हा पब्लिकशी संबंधित असतो. पदनिर्मितीचा जो प्रस्ताव यांच्यासोबत आहे आणि ते प्रवेश नियंत्रण आपण मंजुर करुन घ्यावे. जो पदसिद्ध ठराव आहे. आपण तो मागवा. आपण जो स्टाफ पॅटर्न बनविलेला आहे, मी त्याच्यावर बोलू इच्छितो की, मनुष्यबळ नियोजन करतांना आपल्याला सी.आय.आर.टी.ने जे काही गाईड लाईन्स दिलेले आहे त्याबद्दलदेखील विचार करावा. आपण जी पदनिर्मिती आज या ठिकाणी केलेली आहे. तो पदनिर्मितीचा प्रस्ताव आहे का? आपण सेवाप्रवेशामध्ये ते नियम सामील करुन घेतलेले आहेत का? मला आपल्याकडून क्लिअरन्स पाहिजे की, जे एक ऑफिसर स्थायी समितीचे मा. सभापती असतात, ते स्टँडींग कमिटीचे मा. सभापती हे परिवहन समितीमध्ये एक्स ऑफिसर म्हणून का करित असतात. ते ठरावामध्ये सुचक होऊ शकतात का? कारण आपण आपल्यासमोर या परिवहन समितीचा ठराव ठेवलेला आहे. त्याच्यावर त्यांची सही नाही. आदरणीय सभापती महोदयांची सही नाही आणि शिपाई भरती आणि आपण सफाई कामगारांची जी भरती करतात त्यांना क्वालिफिकेशन पाचवी आणि सातवी पास दिलेले आहे. त्या ठिकाणी मराठीचे ज्ञान असणे आवश्यक आहे, हे जे शब्द आहेत. हे कॉन्स्टीट्युशनल आपल्याला कुठेतरी अडचणीत आणणार आहेत. हे जे साफसफाई करणारे शिपाई असतात किंवा जो स्वच्छता कामगार असतो त्याला मराठी येणे आवश्यक नाही. आपल्याकडे मोठ्या संख्येमध्ये तामिळनाडूचे कर्मचारी आहेत, आपल्याकडे मोठ्या संख्येमध्ये परप्रांतिय आहेत. उदाहरणार्थ, सुरतवरुन आलेला सोलंकी परिवार. हा परिवार, हा समाज पर्टीक्युलरली स्कॅव्हेंजरचे काम बी.एम.सी. किंवा कुठेही करित असतो. आपण ह्यांनादेखील प्राधान्य द्यावे ही माझी एक विनंती आहे. मा. महापौर मॅडम, परिवहन समितीने आणि महानगरपालिकेने सेवाभरतीच्या संबंधी दिलेल्या जाहिरातीमध्ये शेड्युल कास्ट आणि शेड्युल ट्राईब यांच्यासह, मागासवर्गीयांच्या निरनिराळ्या वेतनासाठी राखून ठेवलेल्या पदांची निश्चित संख्या स्पष्टपणे नमुद करणे आणि खात्री करुन घेणे आवश्यक आहे अशी माझी ट्रान्सपोर्ट मॅनेजरना विनंती राहील. दुसरे म्हणजे, ही पदे भरण्यासाठी कायद्याने बंधन आहे. परिवहन समितीने लोकल पेपरमध्ये ॲडव्हरटाइज द्यावी लागते. ते कायद्यान बंधन आहे. जर आपण वेळ दिला तर मी तो जी.आर. वाचून दाखवेन. परंतु, मला बसायला सांगतात म्हणून मी या ठिकाणी बसू इच्छितो. धन्यवाद.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. ३९ वर परिवहन समितीचे दोन वेगवेगळे ठराव आलेले आहेत. मी सदर ठरावाचे वाचन केलेले होते. आता मी प्रकरण क्र. ३९ च्या ठरावाचे वाचन करतो.

**ओमप्रकाश अग्रवाल :-**

एका ठरावामध्ये सही नाही. त्याच्याबद्दल खुलासा करावा. चुकलेला आहे की, खरोखर फक्त मोगम ठेवलेला आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, माझी विनंती आहे की, हा एक महत्त्वाचा विषय आहे. आपण परिवहन समिती आणणार आहोत. आपल्याकडे फिजीबिलीटी नाही, स्टॅबिलीटी नाही. आपला फन्ड नाही. कॉन्ट्रॅक्टरचा फन्ड आहे. आपल्याकडे जागा उपलब्ध नाही. अशा सगळ्या अडीअडचणींमध्ये ट्रान्सपोर्ट मॅनेजर साहेबांचे काय म्हणणे आहे की, सुचक म्हणून एक्स ऑफिसर करु शकतात का? एक्स ऑफिसर परिवहन समितीमध्ये ठराव मांडू शकतात का? पाहिजे तर विधी सल्लागारांना बोलवा. परिवहन समितीमध्ये एक्स ऑफिसर म्हणून स्टॅंडींगचे मा. सभापती आहेत. ते या ठरावावर सुचक होऊ शकतात का? आपण विधी सल्लागारांना बोलवा. मा. महापौर मॅडम, मी आपल्याला विचारतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

विधी सल्लागार आहेत. विधी सल्लागारांना एवढे पैसे देतात. त्यांना एकदा तरी तोंड दाखवायला सांगा. त्यांना घरी ठेवलेले आहे का?

**रोहित सुवर्णा :-**

आपण त्यांना रुपये साडेतेरा हजाराची गाडी दिलेली आहे. त्यांना महासभेत बोलवा. हा फार महत्त्वाचा विषय आहे. उद्या आम्ही अडचणीत येऊ. नाहीतर विधी सल्लागारांना कल्याण डोंबिवली दाखवा.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

मा. महापौर मॅडम, आपण जो वाहतुक अधिकारी आणि तिकिट आणि रोख सहाय्यक हा जो एक हे केलेला होता. आपण तो केडर केलेला आहे. त्याचे पे-स्केल समान ठेवलेले आहे. तो एक केडर केलेला आहे.

**रोहित सुवर्णा :-**

साहेब, क्लास वन आणि क्लास टु चे बेसिक इक्वल होऊ शकत नाही.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

दोन अधिकारी म्हणजे आपल्याला त्याचे केडर करता येते. म्हणजे आपल्याला त्यांचा ट्रान्सफरेबल जॉब करता येऊ शकतो. आपण त्या पद्धतीने तो केलेला आहे. त्याच्या साधारणतः जबाबदाऱ्या इक्वल

प्रकारच्या असतात. आपण त्याच्याध्ये एक केडर केलेले आहे. आपण जो मागासवर्गीय अनुशेष आणि भरतीचे जे म्हटलेले आहे. ते शासनाचे जे काही जी.आर. आहे. त्याच्यामध्ये जी टक्केवारी ठेवलेली आहे की, एस.सी. किती असावे, एस.टी. किती असावे, ओ.बी.सी. किती असावे. ह्याप्रमाणे त्याचे रोष्टर तयार करुनच आपण त्या पद्धतीने त्याच्या नियमाप्रमाणे पालन करणार आहोत. आपण हा जो मुद्दा उपस्थित केलेला आहे की, स्थायी समितीचे मा. सभापती एक्स ऑफिसर सदस्य असतात, ते मुळात एक्स ऑफिसर वगैरे असले तरी ते त्या समितीचे समितीचे सदस्य आहेत. आम्ही या विषयाबाबत तज्ञांशी चर्चा केलेली आहे. त्याप्रमाणे त्या ठरावावर सुचक किंवा अनुमोदन म्हणून सही करु शकतात.

**रोहित सुवर्णा :-**

आपले हे मत आहे की, हे कायद्याने आहे. फार विचार करुन बोला.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

हे कायदेशीर मत आहे.

**रोहित सुवर्णा :-**

सभागृहामध्ये एक्स ऑफिसरना कायद्याने बंधन दिलेले आहे. ते परिवहन समितीमध्ये एक्स ऑफिसर म्हणून फक्त पदसिद्ध अधिकारी आहेत.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

मी आपल्याला माझे कायदेशिर मत सांगितलेले आहे.

**रोहित सुवर्णा :-**

ठिक आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छिते की, आत्ता बऱ्याचशा सन्मा. सदस्यांनी या गोष्टीचा खुलासा मागितला की, आमच्यासमोर ठराव आलेला आहे. त्याच्यावर सुचक म्हणून एक्स ऑफिसरची सही नाही तरी ह्या गोष्टीचा खुलासा मघापासून इतर सन्मा. सदस्य मागत आहेत. परंतु, कोणी खुलासा दिलेला नाही. ह्याच्यातील काय घोळ आहे ते मला सांगा.

**प्र. सचिव :-**

मुळ कॉपीवर त्यांची सही आहे.

**मुक्ता रांजणकर :-**

मुळ कॉपीवर सही आहे. मग आम्हांला ही कुठली कॉपी दिलेली आहे.

**प्र. सचिव :-**

दोन कॉप्या असतात. त्याच्यामधली एक कॉपी झेरॉक्स काढलेली आहे. ती कॉपी दिलेली आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

एका कॉपीवर अनुमोदन म्हणून सही केलेली आहे. जर इथे अनुमोदनाची सही आहे तर मग इथे सुचकाची सही का नाही?

**मुक्ता रांजणकर :-**

तुम्ही आमच्यासमोर ती कॉपी सादर करा. ही कॉपी कशाला आणता?

**मिलन म्हात्रे :-**

या ठिकाणी मा. सभापतींची सुद्धा सही नाही.

**मुक्ता रांजणकर :-**

या कॉपीवर मा. सभापतींची सुद्धा सही नाही. तुम्ही मुळ कॉपीवर काहीतरी वेगळे लिहिलेले आहे का? ठराव वेगळा आहे का?

**प्र. सचिव :-**

वेगळा ठराव नाही.

**जयंत पाटील :-**

ही जी टिपणी दिलेली आहे. ही मा. सभापतींना मंजूर आहे असे त्यांनी सांगावे. मा. सभापती महोदय, ही टिपणी आपल्याला मंजुर आहे का?

**शांताराम ठाकुर :-**

माझ्या मनात संपुर्ण कामकाजाबद्दल संशय नाही. सही नसेल तर गैरसमज करुन घेऊ नका.

**जयंत पाटील :-**

या मिटींगमध्ये विषय पदमंजुरीसाठी आलेला आहे. या शहरामध्ये पुर्वापार आगरी, कोळी, ख्रिश्चन हा समाज मोठ्या प्रमाणात राहतो. त्यांची मुले सुशिक्षित, ग्रॅज्युएट झालेली आहेत आणि परिपुर्ण आहेत. आपण त्यांना ह्याच्यामध्ये किती टक्के आरक्षण देणार आहात? स्वातंत्र्य सैनिकांची मुले आहेत, एस.सी., एस.टी., ओ.बी.सी. सगळा समाज या ठिकाणी आहे. आपण या शहरातून शंभर टक्के भरती करावी अशी माझी सुचना आहे.

**मा. महापौर :-**

रोष्टरप्रमाणे केले जाईल.

**हॅरल बोर्जीस :-**

मा. महापौर मॅडम, प्रकरण क्र. २१ चा ठराव क्र. २२ (ठरावाचे वाचन केले.)

**सुर्यकांत भोईर :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रफुल्ल पाटील :-**

मा. महापौर मॅडम, परवाच्या दिवसाची पुनरावृत्ती पुन्हा होत आहे. या ठिकाणी परिवहन सेवा सुरु करण्यासारखा एक चांगला विषय असतांना या सभागृहाला कुठल्याच सन्मा. सदस्याचा त्याला विरोध असणे संयुक्तिक ठरणार नाही असे मला वाटते. परंतु, आम्ही जेव्हा कुठल्याही विषयावर एखादा निर्णय घेतो किंवा त्यांना ठरावानुसार अंमलबजावणी देण्याचा प्रयत्न करतो तेव्हा करण्यांत आलेला ठराव हा ज्या गोष्टीसाठी करायचा असतो आणि जर तुम्हांला ती गोष्ट खरोखर अंमलात आणायची असेल तर तशा पद्धतीने केले पाहिजे. आपल्याला आपल्या दोन्ही ठरावामधील शेवटची ओळ सांगतो की, परिवहन सेवे कामावरील वरील पदांची पदनिर्मिती करण्यासाठी ही सभा मंजुरी देत असून सदरचा प्रस्ताव मंजुरीसाठी, मान्यतेसाठी शिफारस करीत आहोत. हा प्रकरण क्र. १२ वरील ठराव आहे. प्रकरण क्र. २२ वर ठराव शासनाच्या पुन्हा धोरणाप्रमाणे संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे असे अप्राप्त असल्यास रुजु झाल्यापासून सहा महिन्यात ते प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहिल. वरील पदांना मंजुरी देणेकामी व शासन मंजुरीकरिता मान्यतेसाठी पाठविण्यासाठी आजची सभा मंजुरी देत आहे. मला परिवहन प्रबंधकांनी फक्त एकाच गोष्टीचा खुलासा करायचा आहे की, हा तुमचा ठराव पदनिर्मितीसाठी आहे की, सेवाप्रवेश नियमांसाठी आहे? ज्या वेळेला आम्हांला सेवाप्रवेश नियम करायचे होते तेव्हा तुम्ही विनियम केले. त्यामुळे आमचे सगळे कर्मचारी पुढच्या सुविधांपासून वंचित राहणार आहेत, तो विषय नाही. आपण त्याला जोडून काय बोलता की, पुन्हा तुम्ही आजचा जो ठराव आणलेला आहे हा सेवाप्रवेश नियमांचा आहे. ह्याच्यामध्ये तुम्ही ज्या अटीशर्ती घातलेल्या आहेत, जोपर्यंत तुमची कुठलीही पदे मंजुर होत नाहीत, पदनिर्मितीचा प्रस्ताव हा फक्त पद निर्मितीसाठी असावा लागतो. त्याच्यासाठी तुम्हांला किती पदे, कुठल्या पदनामाची असावी हा उल्लेख त्याच्यामध्ये असतो. त्याच्यासाठी तुम्हांला त्याच्यामध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख करता येतो. परंतु, सेवेच्या अटीशर्तीचा उल्लेख करता येत नाही. तुम्हांला पाहिजे असेल तर महपालिकेने प्रशासकिय कारकिर्दीमध्ये क्र ७१ चा जो प्रशासकीय ठराव पाठविलेला होता तो तुम्ही तपासून बघा. त्या ठरावामध्ये कुठेही सेवेच्या अटीशर्ती विहित केलेल्या नाहीत. हे सगळे सेवाप्रवेश नियम जोपर्यंत पदे निर्माण होत नाहीत, तोपर्यंत तुम्हांला ते नियम करता येणार नाहीत. म्हणून तुम्ही जर या ठरावात असे म्हटले की, या सेवाशर्तीच्या नियमांसह याला मंजुरी देत असाल तर पुन्हा कायदेशीर बाब तपासून बघा. मी काय हुशार माणुस आहे असे माझे म्हणणे नाही. परंतु, परिवहन सेवा चांगली अत्यावश्यक सेवा सुरु करीत असतांना आपण एक काम, करायला आलो गणपती आणि झाला मारुती, असे व्हायला नको. म्हणून मर्यादा सेवाप्रवेश नियमांच्या देता ह्याला फक्त पदनिर्मितीचा प्रस्ताव म्हणून आपण या ठिकाणी मंजुर करावा. याच्यामध्ये ज्या सेवाशर्तीच्या अटीशर्ती घातलेल्या आहेत. क्र. ७१ चा प्रशासकीय ठराव बघा. पाहिजे तर मी तुम्हांला डायसवर तो ठराव पाठवतो. त्याच्यामध्ये अशा प्रकारची शैक्षणिक पात्रतेच्या अटीशर्ती शिथिल करण्याबाबतची कुठलीही नोंद नाही. आपण जर ह्याच्यामध्ये सेवाप्रवेश नियम घालून पाठवित असाल तर शासन प्रस्ताव मान्य करेल की नाही हे मला माहिती नाही. परतु, याच्यापुर्वी शासनाने असे केलेले नाही. फक्त किती पदे आहेत, तुम्ही चार मागितली तर त्यांनी दोन मंजुर केलेली आहेत. म्हणून पदनिर्मितीच्या प्रस्तावामध्ये सेवाशर्तीच्या ज्या अटी टाकलेल्या आहेत. आपण त्या अटी एक्सक्लुड कराव्यात. पदनिर्मिती झाल्यानंतर, मंजुर झाल्यानंतर आपण त्याच्यामध्ये सेवाप्रवेश जरुर घाला, समाविष्ट करावा. मी अशा पद्धतीची दुरुस्तीची सुचना या ठिकाणी मांडतो.

**रोहित सुवर्णा :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस साहेबांनी जो एक ठराव मांडला त्याची शेवटची लाईन अशी होती की, शासनाच्या धोरणाप्रमाणे संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. असे ज्ञान अप्राप्त असल्यास रुजू झाल्यापासून सहा महिन्याच्या आतमध्ये ते प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहिल अशी एक वाक्यरचना त्यांनी त्या ठिकाणी केलेली आहे. (दुरुस्तीचे वाचन केले.) ज्याला कम्प्युटर येत नसेल, त्याचे ज्ञान नाही, ज्यांना टायपिंग येत नसेल त्यांना सहा महिन्याची मुदत द्यावी. म्हणजे ते टायपिंग आणि कम्प्युटर दोही शिकुन आपल्याकडे येतील ही आपण एक दुरुस्ती करुन घ्यावी अशी माझी विनंती आहे.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. ३९ ठराव १२ सुचक सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे आणि अनुमोदन सन्मा. सदस्य नयना म्हात्रे यांनी या ठिकाणी जो ठराव पाठविलेला आहे. अगोदर सन्मा. सदस्य हॅरल बोर्जीस यांनी मांडलेल्या ठरावामध्ये ही उपसुचना म्हणून त्याच्यामध्ये समाविष्ट करुन घेण्यांत येईल. आपण हा ठराव कृपा करुन मागे घ्यावा. आपण काय म्हणतात की, कर्मचाऱ्यांची एकुण १६९ पदांची परिवहन..........

**मिलन म्हात्रे :-**

मॅडम, जरा त्याच्यामध्ये एक थोडीशी चुक झालेली आहे.

**मा. महापौर :-**

आपण ह्याच्यामध्ये दुरुस्ती म्हणून घेऊ या.

**मिलन म्हात्रे :-**

१६९ पदे आहेत, ती १८५ आहे. आपण जरा तेवढा सुधार करुन घ्या. ती ॲड करुन घ्या.

**मा. महापौर :-**

आपण दुरुस्ती म्हणून १८५ घेऊ या.

**प्रफुल्ल पाटील :-**

ह्याच्यामध्ये सेवाप्रवेश समाविष्ट करता येत नाहीत. आपण ही सुचना मान्य करता का? तुम्ही हा ठराव बघा. पदनिर्मितीचा प्रशासकीय ठराव जेव्हा पाठविला तेव्हा त्याच्यामध्ये सेवाप्रवेश नियम समाविष्ट केलेले नाहीत. यापुर्वी जो महापालिकेने पाठविलेला आहे? त्याच्याबद्दल मी बोलत आहे.

**अजीज शेख (मा. उपायुक्त सो.) :-**

आपण शासनाकडे जो प्रस्ताव पाठविणार आहोत तो पदनिर्मितीचा प्रस्ताव पाठविणार आहोत.

**प्रफुल्ल पाटील :-**

तुम्ही ठरावामध्ये ज्या अटीशर्ती घातलेल्या आहेत. तुम्हाला त्या अटीशर्ती या क्षणाला इन्क्ल्युड करता येणार नाहीत. तो बघा मागचा प्रशसकीय ठरावामध्ये सेवेच्या शर्ती म्हणजे पात्रता म्हणा किंवा मागासवर्गीयांना द्या म्हणा, ते नंतर येणार. सेवाप्रवेश नियम आहेत. तुम्हाला आता ते ह्या ठरावात इन्क्ल्युड करता येणार नाही. हे या ठरावात इन्क्ल्युड केले तर दोन्ही रखडून जाईल. तुमचे सेवाप्रवेश नियम होणार नाही. तुमचा पद निर्मितीचा प्रस्ताव मंजूर होणार नाही. आपण मागच्या ठरावाच्या अनुषंगाने चाला. पदनिर्मितीच्या प्रस्तावाला कोणाचा विरोध नाही.

**प्रकाश दुबोले :-**

मा. महापौर मॅडम, या ठिकाणी जो ठराव मांडण्यात आलेला आहे. हा पद निर्मितीचा प्रस्ताव या ठिकाणी अनेक सन्मा. सदस्यंनी सुचना मांडलेल्या आहेत. आपण सर्व सुचना ग्राह्य धरुन पदनिर्मितीसाठी जो प्रस्ताव पाठवतो आपल्याला त्याच्यामध्ये कोणती पदे पाहिजे, त्याचे बेसिक काय असेल आणि किती संख्या पाहिजे. आपण त्यांच्याकडे एवढीच मागणी करायची आहे. ज्यावेळेला शासन मंजुर करेल त्यावेळेला त्यांच्या अटीशर्ती काय असतील त्यांची शैक्षणिक पात्रता काय असेल. ते शासन मंजुर करेल त्यांच्या आदेशामध्ये ते सर्व म्हटले जाते की, या पदाला ही शैक्षणिक पात्रता पाहिजे. त्यानुसार आपल्याला आता शैक्षणिक पात्रता आणि अर्हता टाकायची काहीही गरज, आवश्यकता नाही. त्यामुळे पदांची संख्या आणि कोणती पदे पाहिजे याचा आपण ठरावामध्ये उल्लेख करावा.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडम आणि सन्मा. सभागृह या विषयावर चर्चा चालू असतांना मी उपस्थित नव्हतो. परंतु, आता जो चर्चेचा मुद्दा आहे. हा पदनिर्मितीचा प्रस्ताव समजावा अशा सुचना सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेबांच्या आहेत असे आपण मला सांगितले.

**प्रफुल्ल पाटील :-**

या ठिकाणी तसा ठराव आहे.

**मा. उपमहापौर :-**

तसा ठराव आहे. परंतु, आपण असे सांगतांना आपल्याकडे आपल्या सेवाशर्तीमध्ये परिवहनसाठी शैक्षणिक पात्रतेचा कुठलाही उल्लेख केलेला नाही. ह्या सभागृहाची अशी थोडीशी भावना होती की, सभागृहामध्ये एक विषय वारंवार चर्चेला आलेला आहे. तो विषय असा आहे की, स्थानिक लोकांना महापालिकेच्या सेवेत समाविष्ट करण्यासाठी आपल्याला संधी कधी मिळणार किंवा त्यांचा विचार कधी केला जाणार. सन्मा. सदस्य प्रकाश दुबोले साहेबांनी सुचना केली की, शासनाकडून ज्या शैक्षणिक पात्रता निश्चित होतील आपण त्याच शैक्षणिक पात्रता घ्याव्यात. परंतु, मला असे वाटते की, ह्या सभागृहाने त्या शैक्षणिक पात्रता ठरविल्या तर आपल्याला आपल्या स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करुन देता येईल. त्या अनुषंगाने आपण आपल्या प्रस्तावात जी शैक्षणिक पात्रता ठरविलेली आहे, आपल्याला त्याच्यामध्ये काही उपसुचना करायची असेल तर ती उपसुचना केली तर अधिक चांगले राहील असे माझे मत मी व्यक्त करतो.

**प्रफुल्ल पाटील :-**

आपण जे सादर करीत आहात त्याबद्दल सांगायचे तर आपण ह्या ठरावामध्ये काय म्हणतात की, पदनिर्मितीचा प्रस्ताव सादर करतो. पदनिर्मितीचे प्रस्ताव पुर्वी महापालिकेने सादर केलेले आहेत. त्याच्यामध्ये कुठेही शैक्षणिक पात्रतेचा उल्लेख नाही. याचा अर्थ असो नव्हे की, शैक्षणिक पात्रता शासन ठरविणार आहे. परंतु, ते ठरवायचा अधिकार ४५(३), ५४(५), ४५७, २(अ)(ब) खाली आपलाच आहे. परंतु, अगोदर पदोन्नती मंजुर व्हाव्या लागतात. पदनिर्मिती मंजुर झाल्यानंतर तुम्हांला सेवाप्रवेश नियम तयार करावे लागतील. तुम्हांला त्यातून आजच्या तारखेला हे दोन्ही करायचे असेल तर आपण तसा ठराव बदला की, ह्या

पदनिर्मितीला मंजुरी देत आहे आणि त्याच्यासोबत या पदनिर्मितीकरिता लागणारे जे सेवाप्रवेश नियम आहेत त्या नियमांना ४५(३), ५४(५), ४५७, २(अ)(ब) खाली या महासभेच्या अधिकारामधून त्याला आम्ही मंजुरी देत आहोत. तुम्ही ठरावामध्ये असा उल्लेख करुन घ्यावा लागेल. म्हणजे तुमची दोन्ही कामे होतील.

**मा. महापौर :-**

ठरावात दोन्ही प्रकारच्या दुरुस्त्या करुन ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत येत आहे.

**मिलन पाटील :-**

मॅडम, मी तुम्हांला एक सुचना करु इच्छितो की, आता तुम्ही पुढच्या ह्याला असा एक आदेश द्या की, महासभेच्या वेळेला कमीत कमी आपले जे विधी सल्लागार आहेत. त्यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. खरोखर आवश्यक आहे. पुढच्या वेळेला त्यांना सभागृहात बोलवायला सांगा.

**शांताराम ठाकुर :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो की, मा. महापौर, मा. उपमहापौर, नगरसचिव श्री. हरेश पाटील, मा. उपायुक्त श्री. अजीज शेख साहेब, मा. विरोधी सदस्य आणि सन्मा. सदस्य, सत्ताधारी सदस्य आणि पत्रकार बंधु भगिनींनो आणि प्रेक्षक गॅलरीत बसलेले माझे सन्मा. सदस्य आज आपण ठरावाद्वारे आमच्या परिवहनचे दोन्ही ठराव या ठिकाणी प्रायोजित केले. ते पास करुन दिले. त्याबद्दल मी सगळ्या सन्मा. सदस्यांना पुन्हा एकदा धन्यवाद देतो. असेच प्रेम राहू दे. शेवटी जाता जाता एकच सांगेन की, परिवहन सेवा ही याच महानगरपालिकेचे अपत्य आहे आणि हे अपत्य नवीन असल्यामुळे हे पहिल्यांदाच शाळेत जायला आणि चालायला लागलेले आहे. प्रेमाचा हात त्याच्या पाठिवरुन फिरवा आणि त्याला कपडालत्ता शिवून द्यायची जबाबदारी आपल्यावर राहणार आहे. म्हणून वारंवार आपले प्रेम असेच सदैव रहावे. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

**प्रकरण क्र. ३९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. परिवहन समिती सभा दि. ०२/०७/२००५, ठराव क्र. १२ व दि. ०२/०८/२००५, ठराव क्र. २२ नुसार मा. महासभेस शिफारस केलेल्या परिवहन उपक्रम पदनिर्मिती प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ३९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम नव्याने सुरु झालेली असून तिचे प्रत्यक्ष कामकाज सुरु झालेले आहे. सदर उपक्रमाचे कामकाज व्यवस्थित व तिच्या कामकाजात गति येण्यासाठी खालीलप्रमाणे अधिकारी, कर्मचारी ह्यांचा पदनिर्मिती प्रस्ताव तयार करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | वेतन श्रेणी |
|---|---|---|---|
| १ | वाहतूक अधिकारी | ०१ | ५०००-१५०-८००० |
| २ | सहाय्यक वाहतुक अधिकारी | ३ | ४०००-१००-६००० |
| ३ | मुख्य लेखाधिकारी | ०१ | ५५००-१७५-९००० |
| ४ | तिकिट व रोख सहाय्यक | ०१ | ५०००-१५०-८००० |
| ५ | वाहतुक निरिक्षक | ०८ | ४०००-१००-६००० |
| ६ | प्रवर्तक (कंट्रोलर) | ०६ | ४०००-१००-६००० |
| ७ | कनिष्ठ लिपिक | ७ | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ८ | वाहक | १५० | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ९ | वाहन चालक | ३ | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| १० | शिपाई | ०३ | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |
| ११ | स्वच्छता कामगार | ०२ | २५५०-५५-२६६०-६०-३२०० |

शासनाच्या धोरणाप्रमाणे संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. असे ज्ञान अप्राप्त असल्यास रुजू झाल्यापासून ६ महिन्याच्या आत ते प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहिल.

सदर उपक्रमाचे कामकाज चालविण्याकरिता अधिकारी व कर्मचाऱ्यांची एकूण १८५ पदांची परिवहन सेवेकामी पदनिर्मिती करण्यांत येत आहे. सदर पदे ही परिवहन उपक्रम कार्यरत असेपर्यंत अस्तित्वात राहतील.

वरिल पदांना मंजुरी देणेकामी व शासन मंजुरीकरिता मान्यतेसाठी पाठविणेस आजची मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक : श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस.** **अनुमोदन : श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रकरण क्र. ३९ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मा. परिवहन समिती सभा दि. ०२/०७/२००५, ठराव क्र. १२ व दि. ०२/०८/२००५, ठराव क्र. २२ नुसार मा. महासभेस शिफारस केलेल्या परिवहन उपक्रम पदनिर्मिती प्रस्तावास मंजुरी मिळणेबाबत.

**ठराव क्र. ३९ अ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रम नव्याने सुरु झालेली असून तिचे प्रत्यक्ष कामकाज सुरु झालेले आहे. सदर उपक्रमाचे कामकाज व्यवस्थित व तिच्या कामकाजात गति येण्यासाठी खालीलप्रमाणे सेवानियम तयार करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदनाम व वेतन श्रेणी | पद संख्या | अर्हता |
|---|---|---|---|
| १ | वाहतूक अधिकारी<br>५०००-१५०-८००० | ०१ | १) मान्यता प्राप्त विदयापिठाचा पदवीधर<br>२) सहाय्यक वाहतूक अधिक्षक व तत्सम पदावरील सार्वजनिक सेवेतील ७ वर्षांचा अनूभव असल्यास प्राधान्य<br>३) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम)<br>४) संगणकाचे ज्ञान अवगत असणे आवश्यक |
| २ | सहाय्यक वाहतुक अधिकारी<br>४०००-१००-६००० | ३ | १) मान्यता प्राप्त विदयापिठाचा पदवीधर<br>२) सहाय्यक वाहतूक निरिक्षक व तत्सम पदावरील सार्वजनिक सेवेतील अनूभव असल्यास प्राधान्य<br>३) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम)<br>४) संगणकाचे ज्ञान अवगत असणे आवश्यक |
| ३ | मुख्य लेखाधिकारी<br>५५००-१७५-९००० | ०१ | १) वाणीज्य शाखे मधील पदवी धारक<br>२) शासकिय खात्यातील किंवा खाजगी संस्थेतील ५ वर्षाचा अनुभव असल्यास प्राधाण्य<br>३) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम)<br>४) संगणकाचे ज्ञान अवगत असणे आवश्यक |
| ४ | तिकिट व रोख सहाय्यक<br>५०००-१५०-८००० | ०१ | १) मान्यता प्राप्त विदयापिठाचा पदविधर वाणिज्य शाखेतील पदवीधारक प्राधाण्य<br>२) सहाय्यक तिकिट व रोख अधिक्षक वा तत्सम पदावरील सार्वजनिक सेवेतील ५ वर्षांचा अनूभव असल्यास प्राधान्य<br>३) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम)<br>४) संगणकाचे ज्ञान अवगत असणे आवश्यक |
| ५ | वाहतुक निरिक्षक<br>४०००-१००-६००० | ०८ | १) मान्यवर विदयापिठाचा पदवीधर<br>२) मार्ग परिवहन संस्थेतील सहाय्यक वाहतूक निरिक्षक या पदावरील अनूभव असल्यास प्राधान्य<br>३) मुंबई मोटार वाहन अधिनियम १९३९ मधील तरतुदीची माहिती असल्यास प्राध्यान्य<br>४) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम)<br>५) संगणकाचे ज्ञान अवगत असणे आवश्यक |
| ६ | प्रवर्तक (कंट्रोलर)<br>४०००-१००-६००० | ०६ | १) मान्यता प्राप्त विद्यापिठाचा पदवीधर<br>२) वाहन व्यवस्था व वेळापत्रक या संबंधीची माहिती असल्यास प्राधान्य.<br>३) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागसवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम)<br>४) संगणकाचे ज्ञान अवगत असणे आवश्यक. |

| अ.क्र. | पदनाम व वेतन श्रेणी | पद संख्या | अर्हता |
|---|---|---|---|
| ७ | कनिष्ठ लिपिक<br>३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ७ | १) किमान एच. एस. सी. उत्तीर्ण किंवा त्यापेक्षा जास्त शैक्षणिक पात्रता असल्यास त्यास प्राधान्य.<br>२) शासकिय/ निमशासकिय अथवा सार्वजनिक संस्थेचा अनुभव असल्यास प्राधान्य<br>३) टंकलेखन व संगणकाचे ज्ञान अवगत असणे आवश्यक<br>४) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम) |
| ८ | वाहक<br>३०५०-७५-३९५०-८०-४५९० | १५० | १) १० वी पास<br>२) वाहकाचा नुतनीकरण केलेल्या आर.टी.ओ. परवाना व बॅज आवश्यक<br>३) उंची १५४ से.मी. ते १८० से. मी.<br>४) वय २१ ते ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम)<br>५) संगणकाचे ज्ञान अवगत असणाऱ्यास प्राधान्य. |
| ९ | वाहन चालक<br>३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ३ | १) १० पास.<br>२) नुतनीकरण केलेला हलकी / जड वाहन चालविण्याचा आर.टी.ओ. परवाना आवश्यक. वाहन चालविण्याचा अनुभव.<br>३) उंची १५८ से.मी. ते १८० से.मी.<br>४) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागसवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम) |
| १० | शिपाई<br>२५५०-५५-२६६०-६०-३२०० | ०३ | १) ७ वी पास<br>२) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>३) शारिरिक दृष्ट्या सुदृढ<br>४) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम) |
| ११ | स्वच्छता कामगार<br>२५५०-५५-२६६०-६०-३२०० | ०२ | १) ५ वी पास<br>२) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>३) शारिरिक दृष्ट्या सुदृढ<br>४) वय ३३ वर्षापेक्षा जास्त नसावे (मागासवर्गीयांसाठी ५ वर्षे शिथिलक्षम) |

शासनाच्या धोरणाप्रमाणे संगणकाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. असे ज्ञान अप्राप्त असल्यास रुजू झाल्यापासून ६ महिन्याच्या आत ते प्राप्त करुन घेणे अनिवार्य राहिल.

सदर उपक्रमाचे कामकाज चालविण्याकरिता अधिकारी व कर्मचाऱ्यांची एकूण १८५ पदांची परिवहन सेवेकामी पदनिर्मिती करण्यांत येत आहे. सदर पदे ही परिवहन उपक्रम कार्यरत असेपर्यंत अस्तित्वात राहतील.

वरिल पदांना मंजुरी देणेकामी व शासन मंजुरीकरिता मान्यतेसाठी पाठविणेस आजची मा. महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक : श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस.** **अनुमोदन : श्री. सुर्यकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जयंत पाटील :-**

एक दुःखाचा ठराव मांडायचा आहे.

**मा. उपमहापौर :-**

आपल्या सभागृहाचे सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांचे वडील कै. वसंत म्हात्रे साहेब यांना दि. १८/०८/२००५ रोजी देवाज्ञा झाली. त्यांच्या निधनाबद्दल या सभागृहास अतिव दुःख होत असून हे सभागृह सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सामील आहे. परमेश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो. अशी आपण या सभागृहातर्फे प्रार्थना करुन दोन मिनिटे उभे राहून आपण त्यांना श्रद्धांजली द्यायची आहे.

**रोहित सुवर्णा :-**

मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, वसंतराव गोविंदराव म्हात्रे हे भाईंदर सेवा शेतकरी सहकारी सोसायटीची १९४५ साली जी स्थापन झाली त्या संस्थेचे ते फाऊन्डर मेंबर होते. तसेच ते राष्ट्रसेवा दलाचे कार्यकर्ते होते. तसेच ते भारतीय रेल्वेमध्ये ब्रिटीशांच्या हाताखाली सुतार पॅटर्न मेकर म्हणून अनेक वर्षे काम केलेले आहे.

**जयंत पाटील :-**

तसेच ठाणे जिल्हा परिषदेचे माजी सभापती कृष्णराव म्हात्रे यांचेसुद्धा ते बंधू होते.

**दुःखवटा ठराव क्र. ३९ ब :-**

सन्मा. सदस्य श्री. मिलन म्हात्रे यांचे वडील तसेच ठाणे जिल्हा परिषदेचे माजी सभापती कृष्णराव म्हात्रे यांचे बंधू कै. वसंत म्हात्रे साहेब यांना दि. १८/०८/२००५ रोजी देवाज्ञा झाली. त्यांच्या निधनाबद्दल या सभागृहास अतिव दुःख होत असून हे सभागृह सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांच्या कुटूंबियांच्या दुःखात सामील आहे. परमेश्वर मृतात्म्यास चिरशांती देवो.

**सुचक :- श्री. जयंत पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. नयना म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे मी जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी ०१.०५ वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**